मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १८२ ■ बुधवार, ११ मार्च २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514



त्वरित पत्रकार पाहिजेत !
महाराष्ट्र व देशासह जगभरात डिजिटल माध्यमातून पोहचणारे दैनिक
PRESS
दैनिक युवक आधार मराठी
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे,तालुका, जिल्हा परिषद सर्कल,लोकसभा, विधानसभा या क्षेत्रांमध्ये पत्रकार पाहिजेत
अधिक माहिती साठी संपर्क
श्री संतोष शिवदास आमले
संपादक - ९२२०४०३५०९


# महाराष्ट्राच्या राज्यपालपदी जिष्णु देव वर्मा यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राज्यपालपदी नियुक्ती झालेले तेलंगणाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांचे सोमवार दि 9 वाजता पत्नी सुधा देव वर्मा यांचे सह मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आगमन झाले.त्या प्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुंबईच्या महापौर रितू तावडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भरती आदींनी त्यांचे स्वागत केले जिष्णु देव वर्मा हे महाराष्ट्राचे 22 वे नियुक्त राज्यपाल आहेत..

सन 2018 ते 2023 या कालावधीत ते त्रिपुराचे उपमुख्यमंत्री होते. जिष्णु देव वर्मा यांनी वित्त, ग्राम विकास व ऊर्जा खात्यांचा कार्यभार सांभाळला आहे. आधुनिक कला, चित्रकला आणि शिल्पकलेची आवड असलेले जिष्णु देव वर्मा हे इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अँड कल्चरल हेरिटेज (INTACH) संस्थेच्या त्रिपुरा विभागाचे संयोजक होते आणि संस्थेच्या ईशान्य भारतातील उपक्रमांचे समन्वयक होते. ते उत्तम लेखक व कवी देखील आहेत.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या आगमन प्रसंगी महाराष्ट्र लोकभवन येथे पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली.यावेळी पोलीस महासंचालक सदानंद दाते, पोलीस आयुक्त देवेन भरती, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे उपस्थित होते मंगळवार दिनांक 10 मार्च रोजी दुपारी 4:30 वाजता त्रिपुरा येथील माणिक्य राजघराण्यातील सदस्य व तेलंगणाचे माजी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी आज महाराष्ट्राच्या 22 व्या राज्यपाल पदाची शपथ घेतली.



लोकभवनातील दरबार हॉल येथे झालेल्या शपथविधी सोहळ्याप्रसंगी सुरुवातीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या नियुक्तीसंदर्भातील राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी काढलेली अधिसूचना वाचून दाखवली. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी जिष्णु देव वर्मा यांना राज्यपाल पदाची शपथ दिली. शपथविधीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी राज्यपालांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली. दिनांक12 सप्टेंबर 2025 रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भारताच्या उपराष्ट्रपती पदावर निवड झाल्यानंतर गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांचेकडे महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपविण्यात आला होता.

शपथविधी सोहळ्याला राज्यपालांच्या पत्नी सुधा देव वर्मा तसेच इतर कुटुंबीय, विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, माजी मुख्यमंत्री सुशील कुमार शिंदे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ नीलम गोऱ्हे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, अन्न व औषधी प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, राज्यपालांचे सचिव डॉ प्रशांत नारनवरे, मुंबईतील विद्यापीठांचे कुलगुरु, राजशिष्टाचार सचिव राजेश गावंडे तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होतेकार्यक्रमाची सुरुवात पोलीस बँडने वाजवलेल्या राष्ट्रीय गीत 'वंदे मातरम', राष्ट्रगीत व राज्यगीताने झाली तर सांगता 'वंदे मातरम' व राष्ट्रगीताने झाली. शपथविधी नंतर राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली.

## () थोडक्यात ()

### श्री भैरवनाथ मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन सोहळा उत्साहात साजरा होणार



**दैनिक युवक आधार**

**सणसर – विकास क्षत्रिय :** सणसर (ता. इंदापूर,) येथील श्री भैरवनाथ मंदिरात मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिन सोहळा मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात येणार आहे. यंदा या सोहळ्याचे दहावे वर्ष असून, फाल्गुन कृ.8 बुधवार दि. 11मार्च 2026 रोजी हा धार्मिक उत्सव पार पडणार आहे.यावर्षी गावातील लोकवर्गणीतुन यात्रा कमिटीच्या माध्यमातून मंदिरासमोर मेघडंबरी शोभेची फुले तसेच मंदिर परिसरात रंगकाम करण्यात आले असल्यामुळे परिसर शोभून दिसत आहे.कार्यक्रमात कीर्तन सेवा ह.भ.प. सुनिल महाराज माने, तावशी यांची ठेवण्यात आली आहे.

### लोकनेते बाळासाहेब देसाई यांना जयंतीनिमित्त विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्याकडून अभिवादन



**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे माजी मंत्री, लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या ११६व्या जयंतीनिमित्त मुंबईतील मेघदूत निवासस्थान येथे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधान परिषद सभापती राम शिंदे, यांच्यासह मंत्रिमंडळातील अनेक ज्येष्ठ मंत्री यांनीही लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. गोऱ्हे यांनी, देसाई परिवाराची भेट घेऊन विचारपूस केली आणि त्यांच्या कार्याचे स्मरण केले.

### महाराष्ट्र तापला!! ३९c

**दैनिक युवक आधार**

**वैभव श्रीरंग गायकवाड :** मार्च महिन्याच्या अगदी सुरुवातीपासुनच संपूर्ण महाराष्ट्रात उन्हाच्या झळा बसू लागल्या आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत मार्च महिन्यात मुंबई - ठाणे - रायगड लगत तापमानाची नोंद ही फारच उष्ण नोंदविली गेली आहे.मुंबई ३८°c, नाशिक ३६. ५°c, पुणे ३९°c तर नागपूर ३८. २°c इतके नोंदविले गेले आहे. ही उष्णतेची तीव्रता वर्षानुवर्षे वाढतच चालली आहे, दरवर्षी तापमानाचे नवीन रेकॉर्ड बनत चालले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे.

# खा खेळा वाचा अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धा

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी :** सांस्कृतिक युवा प्रतिष्ठान सीवूड्स येथे अपर्णा राजेश शहा संस्थापित "खा खेळा "वाचा अभियानांतर्गत मुलांमध्ये चित्रकला स्पर्धा भरवण्यात आली. ज्यामध्ये अनेक मुलांनी स्वयंप्रेरणेने




आणि उत्साहाने या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला. वाहतूक पोलीस देखील या स्पर्धेत उपस्थित होते. यावेळी पोलिसांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेचा हेतू मुलांमध्ये उत्साह, एकाग्रता, कल्पना, आणि स्पर्धात्मक परीक्षेची तयारी, साधून सवयींना चांगल्या सवयीमध्ये परिवर्तित करण्यात हेतू होता.

# जावेळे परिसरात बिबट्याचा वावर; ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/ अनिकेत मोहित :** गेल्या काही दिवसांपासून जावेळे परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये प्रचंड घबराट पसरली आहे.रात्रीच्या वेळी बिबट्या लोकवस्तीच्या जवळ येत असल्याने ग्रामस्थांनी घराबाहेर पडणे कठीण झाले आहे.परिसरातील काही ठिकाणी बिबट्याचे पाऊलखुणा (ठसे) आढळले आहेत. जावेळे येथील शेतकरी विजय रांगले यांची गुरे नेहमीप्रमाणे चरण्यासाठी जंगलात सोडली होती त्या गुरांपैकी दोन गुरे बिबट्यांनी मारली



आहेत व यापूर्वी इतर शेतकऱ्यांची पाच ते सहा मारल्याची घटना समोर आली असून,काही ग्रामस्थांना बिबट्या दिसल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून यामुळे पशुपालक चिंतेत आहेत

### पिंजरा लावण्याची मागणी

बिबट्यापासून मानवी जीवितास धोक्यापासून संरक्षण व्हावे यासाठी वन विभागाने या घटनेची दखल घेऊन परिसरात गस्त वाढवावी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी त्वरित पिंजरा लावण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थ वन विभागाकडे करत आहेत

# वाशिम जिल्ह्यातील तापमान ३९.२ अंशापार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** मार्च महिन्याला सुरुवात होताच उष्णता वाढू लागली आहे.आतापासूनच उकाडा जाणवू लागला आहे. सूर्य आग ओकन्यास सुरुवात झाली असून वाशिम जिल्हा तापायला लागला आहे. विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. विदर्भातील अकोला, अमरावती आणि विदर्भातील तापमान 40 अंशापार गेले आहे. तर वाशिम जिल्ह्यातही 39 .2 तापमानाची नोंद झाली आहे. मार्चच्या पहिल्याच आठवड्यात विदर्भातील तापमान 40 पार गेल्यामुळे उष्णतेची लाट आली असे म्हटले जात आहे. नागरिकांनी काळजी घेण्याची आवाहन केले जात आहे. हवामान खात्याकडून विदर्भात उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा मध्ये तापमान40अंशाच्या पार केले आहे. अकोल्यात राज्यातील सर्वाधिक 40.8 अंश तापमान झाले आहे. अकोला पाठोपाठ अमरावतीमध्ये40.6 तर वर्धा जिल्ह्यात 40अंश तापमानाची नोंद झाली आहे. तर वाशिम


उष्णतेच्या लाटेचा इशारा

जिल्ह्यातही 39.2 अंश तापमानाची नोंद झाली आहे. पुढील काही दिवसांत राज्याच्या अनेक जिल्ह्यात पारा वाढणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. त्यामुळे विदर्भातील नागरिकांनी दुपारच्या वेळी घराबाहेर पडणे टाळावं, असे आवाहन केले जात आहे. राज्यात उन्हाचा चटका आणि उकाडा कायम राहण्याची शक्यता आहे. कमाल तापमान 40अंशापार गेल्यास आणि तापमानात सरासरीच्या तुलनेत 4.5अंशापेक्षा अधिक वाढ झाल्यास उष्णतेची लाट आल्याचे म्हटले जाते. शनिवारी वाशिम येथे39.2अंश सेल्सिअस तापमानची नोंद झाली होती.तर निफाड येथे राज्यातील सर्वात नीचांकी तापमान 11.5अंश सेल्सिअस ची नोंद झाली.






# जासईच्या उपसरपंचपदी कॉंग्रेसच्या सुलोचना घरत यांची बिनविरोध निवड

## उपसरपंच निवडीने कॉंग्रेस कार्यकर्त्यांचा सन्मान : महेंद्रशेठ घरत



**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** जासईच्या उपसरपंचपदी महाविकास आघाडीच्या सुलोचना पद्माकर घरत (कॉंग्रेस) यांची मंगळवारी (ता. १०) बिनविरोध निवड करण्यात आली. सरपंच संतोष घरत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सुलोचना घरत यांचा एकच अर्ज आल्याने बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी जासई ग्रुप ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य उपस्थित होते.

उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "नवनिर्वाचित उपसरपंच सुलोचना घरत आणि त्यांचे पती दिवंगत पद्माकर घरत हे धडाडीचे कार्यकर्ते, परंतु दुर्दैवाने पद्माकर घरत या कार्यकर्त्यांचे अकाली निधन झाले. सुलोचनाताईंनी पती आजारी असताना उत्तम साथ दिली, याची मला जाणीव आहे. त्यामुळे जेव्हा उपसरपंचपदी निवडणूक जाहीर होताच मी सुलोचनाताईंना उपसरपंचपदी बसवा, अशी विनंती केली. महाविकास आघाडीच्या सर्व सदस्यांनी, नेत्यांनी मनावर घेतले. त्यामुळे सुलोचना ताई उपसरपंचपदी विराजमान झाल्या. यामुळे मला माझ्या कॉंग्रेस कार्यकर्त्यांचा सार्थ अभिमान आहे. शेकाप आणि महाविकास आघाडीच्या सर्वच कार्यकर्त्यांच्या, पदाधिकारी यांच्या मेहनतीने आणि उत्तम सहकार्याने उरणमध्ये आज आपली ताकद दाखवून दिली आहे. लढाऊ महिला निवडून आल्या.

कॉंग्रेसमध्ये सर्वांना सन्मान आहे. आपण सर्व कार्यकर्ते आहोत. मी आपल्यासोबत खंबीरपणे उभा आहे." यावेळी पतीच्या आठवणीने उपसरपंच सुलोचना घरत भाऊक झाल्या होत्या. महेंद्रशेठ घरत यांनी त्यांचे अभिनंदन केले.यावेळी नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य डॉ. मनीष पाटील, पंचायत समिती सदस्य निर्मलाताई घरत, नरेश घरत, कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, संजय ठाकूर, आदित्य घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

# 'पनवेल महापालिकेचा नारी सन्मान' साक्षी सागवेकर यांना प्रदान

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( प्रतिनिधी ) :** जागतिक माहिला दिनानिमित्त पनवेल महापालिकेच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना सन्मानीत करण्यात येते यावर्षीचा हा पुरस्कार सोहळा सोमवार दिः ०९ मार्च रोजी पनवेल महापालिकेच्या फडके नाट्यगृहयत पार पडला. या कार्यक्रमाला महापौर नितीन पाटील , उपमहापौर प्रमिला पाटील, पालिकेचे अतिरिक्त आयक्त महेशकुमार मेघमाने उपस्थित होते.

या कायक्रमात परिणीता सोशल फाऊंडेशनच्या सामाजिक कार्याची दखल घेत संस्थेच्या संस्थापिका साक्षी सागवेकर यांना नारी सन्मान पुरस्कारानं गौरवण्यात आलं. गेली पाच वर्ष परिणीता सोशल फाऊंडेशनच्या माध्यमातून साक्षी सागवेकर उद्योजिकांना व्यासपीठ उभं करुन देण्याचं महत्त्वाचं कार्य करत आहेत.




ठाणे , डोंबिवली , ऐरोली ते पनवेल आणि वाशी ते पनवेल या भागातील हजार दिडहजार महिलांच्या व्यवसायांना ग्राहकांपर्यंत घेऊन जाण्याचं आव्हान त्यांनी लिलया पेललं आहे. आजपर्यंत 60 हून आधिक व्यवसाय प्रदर्शनांचं आयोजन करत नवी मुंबईतल्या हजारो ग्राहकांपर्यंत पोहोचण्यात त्यांना यश मिळालंय.महिलांमध्ये उद्योजकता रुजावी, नव्यानं व्यवसायात उतरणाऱ्या स्त्रीयांना प्रोत्साहन मिळावं आणि त्यांचं कतृत्व जगासमोर यावं या हेतूनं साक्षी सागवेकर गेली चार वर्ष परिणीता सन्मान सोहळ्याचं आयोजन करतात. राजकारण, चित्रपट, मालिका, पत्रकारिता, वैद्यकीय अशा विविध मातब्बर क्षेत्रातल्या कर्तृत्ववान माहिलांना परिणीता संस्थेशी जोडण्यात साक्षी सागवेकरांना यश मिळालं ज्यामुळे विविध व्यवसाय करणाऱ्या छोट्या छोट्या व्यावसायिकांचे कष्ट मोठमोठ्या सेलिब्रेटी माहिलां पर्यंत पोहोचले. या मोठ्या महिलांसोबत परिणीताशी जोडलेल्या छोट्या उद्योजिकांना एकाच व्यास्पीठावर उभं राहण्याची संधी आणि ग्रेरणा परिणीता सन्मानमुळे मिळालीय.

साक्षी सागवेकरांनी दरदृष्टी ठेऊन आखलेल्या या कल्पकतेची दखल आता प्रशासकीय पातळीवर घेण्यात आलीय. पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील आणि उपमहापौर प्रमिला पाटील यांच्या हस्ते साक्षी सागवेकर यांना नारी सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना, माझा हा परस्कार मी परिणीताच्या सर्व सदस्यांना समर्पित करते माझ्यावर विश्वास ठेऊन मला साथ देणाऱ्या परिणीतांचा हा गौरव असल्याचं मी मानतें असं साक्षी सागवेकर यांनी सांगितलं. या पुरस्कारासाठी पनवेल महापालिका, पालिकेचे महापौर नितीन पाटील सर आणि सर्व प्रतिनिधी, कर्मचाऱ्यांचे संस्थेच्यावतीने साक्षी सागवेकर यांनी मानले आभार

### शेलघर येथे आज 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्काराचे वितरण

# पृथ्वीराज चव्हाण आणि रामशेठ ठाकूर अकरा वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर येणार

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** कला, क्रीडा, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय अशा समाजाशी निगडित क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या महिलांना गेल्या अकरा वर्षांपासून 'यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थे'तर्फे 'यमुना स्त्री सन्मान' पुरस्कार दिला जातो. हा समारंभ बुधवारी (ता. ११ मार्च), उलवे नोड येथे शेलघर येथील 'सुखकर्ता' बंगल्याच्या गार्डनवर होणार आहे. आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या मातोश्री दिवंगत यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या नावाने हा पुरस्कार दिला जातो. यंदा पुरस्काराचे बारावे वर्षे आहे. त्यामुळे विविध क्षेत्रांतील १२ महिलांना या वेळी गौरविण्यात येईल. त्यात नवी मुंबईच्या नवनिर्वाचित महापौर सुजाता पाटील, पनवेलच्या उपमहापौर प्रमिला पाटील, उरणच्या नगराध्यक्षा भावना घाणेकर अशा राजकीय क्षेत्रांत भरारी घेणाऱ्या महिलांचाही समावेश आहे. पुरस्कार समारंभाच्या निमित्ताने माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि माजी खासदार रामशेठ ठाकूर सुमारे अकरा वर्षांनंतर एकाच व्यासपीठावर येणार आहेत. यावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे युवा अध्यक्ष शिवराज मोरे, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, मुंबई पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, तसेच सिनेअभिनेत्री सायली संजीव उपस्थित राहाणार आहेत.

# अनुसूचित जातीच्या आश्रम शाळांना मान्यता मिळण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** सामाजिक न्याय विभागाकडे मान्यतेस्तव प्रलंबीत नस्ती क्र. १६९ /२०१७ शिक्षण-२ मधील अनु. जातीच्या आश्रमशाळांना शाहू, फुले, आंबेडकर निवासी - अनिवासी शाळा योजनेतून मान्यता देण्याची मागणी नवनिर्माण विकास सेवा संघाचे सचिव गोपाल मधुकरराव पवार यांनी शासनाकडे केली आहे.

नस्ती क्र. १६९/२०१७ शिक्षण-२ ही नस्ती सामाजिक न्याय विभागात शाहू फुले, आंबेडकर निवासी अनिवासी शाळा योजनेतून मान्यतेसाठी प्रलंबित आहेत. यापूर्वी तत्कालीन मंत्री (सामाजिक न्याय) यांनी सदरील नस्त्यामधील आश्रमशाळांना शालेय शिक्षण विभागाच्या तपासणीचा अधिन राहून मान्यता दर्शविलेली आहे. तरीही या काळात आश्रमशाळा मान्यता मिळालेली नाही.

सन २०१२ ते २०१८ दरम्यान आमच्या सारख्या २१ आश्रमशाळेस मान्यता दिली आहे. तसेच २०२१ ते २०२२ मध्ये अश्याच प्रकारच्या २८ अनु. जातीच्या आश्रम शाळांना शाहू फुले आंबेडकर निवासी अनिवासी शाळा योजनेतून कायम विना अनुदान तत्वावर मान्यता दिल्या आहेत.

या नस्ती मधील आश्रमशाळा २००९ पासून सुरु आहेत व वेळोवेळी या आश्रमशाळांची गुनात्मक तपासण्या झालेल्या असून सुद्धा या आश्रमशाळांना आत्ता पर्यंत शासनाने मान्यता दिलेली नाही. सदरील नस्ती मधील आश्रमाशाळांना शालेय शिक्षण विभागाने मान्यता मिळण्यासाठी ना शिफारस केली आहे. त्यानंतर तत्कालीन मंत्री (सामाजिक न्याय) यांच्याकडे नस्ती मान्यतेसाठी फेरसादर केली असता त्यांनी सदरील नस्तीमधील आश्रमशाळांना मान्यता दिलेली आहे. परंतु सामाजिक न्याय मंत्री यांनी मान्यता देऊनही तत्कालीन सचिव, सामाजिक न्याय यांनी आश्रमशाळेच्या मान्यता आदेश निर्गमित केला नाही.

हा आमच्या संस्थेवर अन्याय असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे सामाजिक न्याय यांच्याकडे मान्यतेस्तव प्रलंबीत नस्ती क्र. १६९/२०१७ शिक्षण-२ मधील अनु. जातीच्या आश्रमशाळांना शाहु, फुले, आंबेडकर निवासी/अनिवासी शाळा योजनेतुन मान्यता देण्याची मागणी गोपाल मधुकरराव पवार यांनी शासनाकडे केली आहे.

# सिडको गार्डनच्या भिंतीजवळ मृतदेह अनोळखी आढळला

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** खांदेश्वर पोलीस स्टेशन हद्दीत नवीन पनवेल येथील विचुंबेकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सिडको गार्डनच्या भिंतीजवळ अनोळखी मृतदेह आढळला त्याला रुग्णवाहिकेतून पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्याने तपासणीनंतर १२/०२/२०२६ रोजी ११:४५ वाजता त्याला मृत घोषित केले. असून सदर नातेवाईकांचा शोध सुरूआहे सदर मृत व्यक्तीचे वर्णन खालील प्रमाणे : एक अज्ञात पुरूष, अंदाजे ३५-४० वर्षांचा, मध्यम शरीरयष्टीचा, काळे केस आणि दाढी असलेला.कपडे: त्याने पांढरा हाफ-स्लीव्ह टी-शर्ट घातला



होता ज्यावर गुलाबी आणि पांढऱ्या अक्षरात "स्पाईस वाडी हॉटेल" असे लिहिलेले काळ्या रंगाचे लोगो होते आणि काळी हाफ-पँट घातली होती. सदर व्यक्तीस ओळखत असल्यास शैलेश भद्रे 9850641629 पोलीस उपनिरीक्षक, यांना संपर्क करण्याचे आवाहन खांदेश्वर पोलीस ठाणे, नवी मुंबई च्या वतीने करण्यात आले आहे

# एका रात्रीत 08 दुकाने फोडून चोरी करणारी टोळी मिरजगाव पोलीसांकडून 12 तासांचे आत जेरबंद

**दैनिक युवक आधार**

**सतीश शिंदे/मिरजगांव प्रतिनिधी :** मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत दिनांक 04/03/2026 रोजी सायंकाळी 08/00 वा. ते दिनांक 05/03/2026 रोजी सकाळी 09/00 वा.चे सुमारास मिरजगाव ते कडा जाणारे रोडवर, वीर पाटील कॉम्प्लेक्स मधील 8 दुकानांच्या पाठीमागील पत्रा कश्याचे तरी सहाय्याने उचकाटुन आत मध्ये प्रवेश करुन अज्ञात आरोपींनी सोलर किटचे एकुण 13 कंट्रोलर, सी.सी.टी.व्ही. कॅमेराचा डि.व्हि.आर, ड्रील मशिन, स्पॅनर सेट, ट्रॅक्टरचे टेप, स्पीकर वायर, कटर, रोख रक्कम असा मुद्देमाल स्वत:चे आर्थिक फायदयाकरीता लबाडीच्या इरादयाने फिर्यादीचे संमती शिवाय चोरुन नेला होता. सदरबाबत अभय बाळासाहेब दळवी, रा. तिखी, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपींविरुद्ध मिरजगाव पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं. 74/2026 बी.एन.एस.का.कलम 331(4), 334(1), 305, 324(4), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिरजगाव पोलीस स्टेशन हद्दीत एकाच रात्रीत 08 दुकाने फोडून चोऱ्या झाल्यांमुळे व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते. सदर गुन्हा उघडकीस




एकूण 1,15,000/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

आणणेकामी जिल्ह्याचे पोलीस अधिक्षक मा. श्री. सोमनाथ घार्गे यांनी मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबतच्या सूचना दिलेल्या होत्या. त्यानुसार अपर पोलीस अधिक्षक, अहिल्यानगर मा. श्री. वैभव कलबुर्गे, उपविभागीय पोलीस अधिकारी कर्जत, मा. श्री. प्रविणचंद्र लोखंडे यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी सहायक पोलीस निरीक्षक विजय झंजाड, व मिरजगाव पोलीस स्टेशनचे तपास पथक सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि विजय झंजाड यांना गुप्त बातमीदारांमार्फत बातमी मिळाली की, सदरचा गुन्हा हा मनोहर भीमराव पवार, रा. बीडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड याने व त्याचे साथीदारांसह मिळून केला असून त्यानुसार मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि विजय झंजाड व तपास पथकातील अंमलदार यांनी आरोपी नामे- 1) मनोहर भीमराव पवार, रा. बीडसांगवी, ता. आष्टी, जि. बीड याचा शोध घेवून त्यास ताब्यात घेण्यात आले.ताब्यातील इसमाकडे सखोल व बारकाईने विचारपूस करता त्याने सदरचा गुन्हा हा 2) अरुण रघुनाथ बर्डे, 3) काळुराम चंदु माळी, 4) ज्ञानेश्वर गंगाराम साळुंखे, 5) सुरेश बाळु माळी, 6) भास्कर बबन गांगर्डे, सर्व रा. देवीनिमगाव, ता. आष्टी, जि. बीड अशांनी मिळून केला असल्याचे सांगितले. त्यानुसार सदर इसमांचा शोध घेवून त्यांना ताब्यात घेवून सदर आरोपींना गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली असून सदर गुन्ह्याचे तपासात अटक आरोपींकडून एकूण 1,15,000/- रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी नामे- मनोहर भीमराव पवार याचेविरुद्ध आष्टी पोलीस स्टेशन, जि. बीड येथे गुन्हा रजि. नं. 118/2015 भा.दं.वि.कलम 379, 34 प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर कामगिरी ही पोलीस अधिक्षक अहिल्यानगर, मा. श्री. सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधिक्षक अहिल्यानगर, मा. श्री. वैभव कलुबर्मेर्, उपविभागिय पोलीस अधिकारी कर्जत उपविभाग मा. श्री. प्रविणचंद्र लोखंडे यांचे सूचना व मार्गदर्शनाखाली मिरजगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी सहा. पोलीस निरीक्षक श्री. विजय झंजाड, सफौ/ शंकर रोकडे, पोहेकॉ/ गणेश ठोंबरे, पोकॉ/ सुनिल खैरे, पोकॉ/ गोकुळ पळसे, पोकॉ/ राजेंद्र गाडे, पोकॉ/ अक्षय गार्डे, पोकॉ/ बळीराम काकडे, होमगार्ड प्रशांत माने, अजय फुलमाळी, अक्षय पवार, दिपक काळे, बिभीषण रणदिवे अशांनी मिळून केली आहे. ह्या उत्कृष्ट कामगिरी मुळे मिरजगांव पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.सदर गुन्हयाचा पुढिल तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सफौ/ शंकर रोकडे हे करित आहेत.

# अजित पवार यांच्या अपघाताचा मुद्दा मंडला विधान परिषदेत

## अमोल मिटकरी यांची सखोल चौकशीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका :** विधान परिषदेत आज झालेल्या कामकाजादरम्यान आमदार अमोल मिटकरी यांनी अजित पवार यांच्या अपघाताचा मुद्दा सभागृहात उपस्थित करत या प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली. या अपघाती मृत्यूबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत असल्याने शासनाने संपूर्ण घटनेची वस्तुनिष्ठ चौकशी करून सत्य समोर आणावे, असे त्यांनी सांगितले.

मिटकरी यांनी सभागृहात बोलताना सांगितले की, या घटनेमुळे

संबंधित कुटुंबावर मोठे दु:ख ओढवले आहे. विशेषत: या प्रकरणात पिंकी माळी यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या आईला मोठा मानसिक धक्का बसला असून त्या सध्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. या परिस्थितीची शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

तसेच पिंकी माळी यांच्या आईच्या आरोग्याची काळजी घेणे ही शासनाची जबाबदारी असून त्यांना योग्य आणि तत्काळ वैद्यकीय उपचार मिळावेत यासाठी सरकारने पुढाकार घ्यावा, असेही मिटकरी यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाची पारदर्शक चौकशी होऊन दोषींवर योग्य ती कारवाई व्हावी आणि पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, अशी मागणी करत या विषयावर शासनाने स्पष्ट भूमिका मांडावी, असेही त्यांनी सभागृहात नमूद केले.

# समतानगर, कांदिवली येथील म्हाडा पुनर्विकास प्रकल्पावरून विधान परिषदेत खडाजंगी; शंभूराज देसाई कोंडीत

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका :** कांदिवली येथील समतानगर परिसरातील रखडलेल्या म्हाडा (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण) गृहनिर्माण संस्थेच्या पुनर्विकास प्रकल्पाचा मुद्दा आज महाराष्ट्र विधान परिषदेत चांगलाच गाजला. या विषयावर विरोधी व सत्ताधारी पक्षातील काही सदस्यांनी एकत्र येत राज्याचे मंत्री शंभूराज देसाई यांना कोंडीत पकडत सरकारकडून ठोस उत्तराची मागणी केली.

हा प्रश्न श्रीकांत भारतीय यांनी सभागृहात उपस्थित केला. कांदिवलीतील समतानगर भागातील म्हाडाच्या गृहनिर्माण संस्थेचा पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडलेला असून रहिवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रकल्पाबाबत प्रशासनाकडून स्पष्ट भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मंत्र्यांकडून मिळालेल्या उत्तरावर समाधान न झाल्याने सदस्यांनी अधिक आक्रमक भूमिका घेतली. यावेळी प्रवीण दरेकर, अनिल परब, सचिन अहिर आणि भाई जगताप यांनीही चर्चेत सहभाग घेत मंत्री देसाई यांना प्रकल्पाबाबत ठोस भूमिका मांडण्याची मागणी केली.

सदस्यांनी सांगितले की, हा प्रकल्प दीर्घकाळ रखडल्यामुळे स्थानिक रहिवाशांना असुरक्षित इमारतींमध्ये राहावे लागत आहे. त्यामुळे सरकारने या पुनर्विकासाला गती देण्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.सभागृहातील या चर्चेमुळे काही काळ वातावरण तापले होते. सदस्यांनी सरकारकडून स्पष्ट वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी करत प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लावण्याची आवश्यकता अधोरेखित केली. दरम्यान, या मुद्द्यावर सरकारकडून पुढील कार्यवाहीबाबत माहिती देण्यात येईल, असे आश्वासन देत चर्चेची सांगता करण्यात आली.

# पनवेल पंचायत समितीच्या आवारात बंद असलेल्या अर्धवट इमारतीमध्ये गर्दुल्यांचा वावर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** पनवेल पंचायत समितीच्या आवारातील बंद असलेल्या अर्धवट इमारतीत गर्दुल्यांचा वावर वाढल्याने त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात दारूच्या बाटल्या आणि जुगाराचे पत्ते पडलेले दिसत आहेत. त्यावर पोलिसांनी कारवाई करत या गर्दुल्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून पनवेल पंचायत समितीच्या इमारतीचे काम अर्धवट स्थितीत आहे. या ठिकाणी दोन इमारती बांधण्यात येत आहेत. त्यातील एका इमारतीत पनवेल पंचायत समितीचे आणि इतर शासकीय कार्यालय आहेत. मात्र शॉपिंग कॉम्प्लेक्स म्हणून उभारण्यात येत असलेली बंद इमारतीचे अर्धवट स्थितीत बांधकाम करण्यात आलेले आहे. या ठिकाणी कोणी जाऊ नये यासाठी पत्रे लावण्यात आले होते. मात्र या ठिकाणी येणारे गर्दुल्ले यांनी यातील काही पत्रे देखील काढून नेले. रात्रीच्या वेळेस या इमारतींमध्ये गर्दुल्ल्यांचा वावर वाढू



लागला आहे. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात मद्यपान केले जात आहे. तसेच जुगाराचे डाव सुद्धा रंगत असल्याचे समोर आले आहे. मद्याच्या बाटल्या फोडलेल्या अवस्थेत या ठिकाणी दिसत आहेत. इमारतीच्या काही ठिकाणच्या भिंती देखील फोडण्यात आलेल्या आहेत. बाजूलाच झोपडपट्टी असल्याने तेथील गटाराचे पाणी या बंद इमारतीच्या आतमध्ये येत असल्याने दुर्गंधी सुटली आहे. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वीच पोलिसांनी या ठिकाणी गर्दुल्ल्यांवर कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

# अंभोरा गावामध्ये महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**अंभोरा प्रतिनिधी :** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून आष्टी तालुक्यातील अंभोरा गावामध्ये विविध विकासकामांचे लोकार्पण व जागर स्त्री शक्तीचा - खेळ पैठणीचा कार्यक्रम अंभोरा ग्रामपंचायतच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होता. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऐश्वर्याताई धस ह्या होत्या. सेवानिवृत्त सहाय्यक पोलिस आयुक्त रामेश्वर थोरात, लेखक युनूस सय्यद, सरपंच सागर आमले, उपसरपंच दिपाली आमले, ग्रामविकास अधिकारी दिपक नरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अंभोरा गावामध्ये विविध क्षेत्रात अतुलनीय कामगिरी केलेल्या महिलांचा ग्रामपंचायतच्या वतीने नारीशक्ती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये प्राथमिक शिक्षिका अनामिका शिंदे व कविता सोनवणे, आशा सेविका वर्षा गवळी, अंगणवाडी



सेविका प्रिया रुद्राखे यांना मान्यवरांच्या हस्ते नारीशक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.ग्रामपंचायत संचलित सखी प्रेरणा भवनचे लोकार्पण करण्यात आले. यामध्ये सर्व महिलांसाठी सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन व वापरून झालेले पॅड विल्हेवाट लावण्यासाठी स्मार्ट बर्नर स्थापित करण्यात आले आहे. सोबतच गावातील महिला स्वयंसहायता बचत गटातील महिलांच्या उत्पादन प्रक्रियेला गती मिळावी याकरिता ग्रामपंचायत तर्फे बंदिस्त जागा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

गावातील सर्व महिला करदात्यांना मोफत फवारणी पंपाचे वितरण करण्यात आले.मोफत तेल काढणी यंत्र व मोफत मिरची कांडप यंत्राचे लोकार्पण करण्यात आले

अंभोरा ग्रामपंचायत संचलित डॉक्टर ए.पी.जे. अब्दुल कलाम ज्ञानमंदिराचे लोकार्पण यावेळी करण्यात आले. या ज्ञानमंदिरामध्ये सर्वांसाठी मोफत ग्रंथालय, मोफत वाचनालय व मोफत अभ्यासिकेची सुविधा करण्यात आलेली आहे.ग्राम महसूल अधिकारी व सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाचा लोकार्पण सोहळा पार पडला.

पंधराव्या वित्त आयोग निधीतून साकारलेल्या गावांतर्गत रस्त्याचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी ग्रामविकास अधिकारी दिपक नरवडे यांनी अंभोरा ग्रामपंचायत तर्फे राबवलेल्या उपक्रमांची माहिती दिली. सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त रामेश्वर थोरात साहेब यांनी सर्व विकासकामांबाबत समाधान व्यक्त करत सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. इनुची गोष्ट या पुस्तकाचे लेखक युनूस सय्यद यांनी ब्लड कॅन्सरग्रस्त असताना सलग तीन वर्ष मृत्यूशी दिलेली झुंज आपल्या शब्दांत सर्वांसमोर मांडली.कार्यक्रमाच्या अध्यक्षा ऐश्वर्याताई धस यांनी ग्रामपंचायतमार्फत राबवल्या गेलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमाबाबत कौतुक केले व महिलांनीदेखील आपापल्या क्षेत्रात उत्तुंग भरारी घ्यावी अशा शुभेच्छा उपस्थित सर्व महिलांना दिल्या.

**अंभोरा हे गाव 'शिवीमुक्त गाव' व 'जातीमुक्त गाव' घोषित**

महिला दिनानिमित्त आयोजित सभेमध्ये महिलांचा सन्मान करण्यासाठी 'शिवीमुक्त गाव' व जातिभेद नष्ट करण्यासाठी 'जातीमुक्त गाव' करण्याची सूचना मांडण्यात आली. या सूचनेस उपस्थित सर्व महिलांनी हात उंचावून संमती दर्शविली व सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.अंभोरा हे गाव शिवीमुक्त गाव व जातीमुक्त गाव म्हणून घोषित करण्यात आले.

# "गर्भलिंग तपासणी करणाऱ्यांवर संघटित गुन्हेगारीप्रमाणे कारवाई करा" : आमदार सुरेश धस

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** महाराष्ट्र विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आष्टी/पाटोदा/शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी सोमवार दिनांक ९ मार्च रोजी गर्भलिंग तपासणी, मुलींचे संरक्षण आणि ग्रामीण महिलांच्या प्रश्नांवर ठाम आणि अभ्यासपूर्ण भूमिका मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. राज्यात पुन्हा गर्भलिंग तपासणीचे प्रकार समोर येत असल्याबद्दल त्यांनी गंभीर चिंता व्यक्त करत, अशा प्रकारांवर संघटित गुन्हेगारीप्रमाणे कठोर कारवाई करण्याची मागणी केली. सभागृहात बोलताना आमदार धस यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, "समाजात मुलगा - मुलगी समान आहेत असे आपण बोलतो; मात्र प्रत्यक्षात अजूनही मुलींबाबत भेदभावाची मानसिकता दिसून येते. मुलींचे अस्तित्व सुरक्षित ठेवण्यासाठी कठोर पावले उचलणे ही काळाची गरज आहे." काही वर्षांपूर्वी बीड जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर अत्यंत चिंताजनक पातळीवर गेले होते. हजार मुलांमागे केवळ ६२८ मुली इतके प्रमाण नोंदवले गेले होते.




विशेषतः शिरूर तालुक्यात ही स्थिती गंभीर होती. त्या काळात सामाजिक कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी आणि प्रशासन यांच्या प्रयत्नांमुळे परिस्थितीत सुधारणा झाली. मात्र आज पुन्हा काही ठिकाणी गर्भलिंग तपासणीचे प्रकार उघड होत असल्याने हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. या वेळी त्यांनी Pre-Conception and Pre-Natal Diagnostic Techniques Act (पीसीपीएनडीटी कायदा) प्रभावीपणे राबवला जातो का, याचा आढावा घेण्याची मागणी केली. जर हा कायदा अपुरा ठरत असेल, तर त्यात आवश्यक सुधारणा करून

**मुलींचे संरक्षण, पीसीपीएनडीटी कायद्याची कडक अंमलबजावणी आणि ऊसतोड महिला कामगारांच्या प्रश्नांवर सभागृहात वेधले लक्ष**

केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवावा. गर्भलिंग तपासणी करून मुलींचे गर्भपात करणाऱ्या डॉक्टर, एजंट आणि टोळ्यांवर कठोर कारवाई करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीप्रमाणे गुन्हे दाखल करावेत, असेही त्यांनी नमूद केले. ग्रामीण भागात मुलींचे प्रमाण कमी झाल्यामुळे सामाजिक असंतुलन निर्माण होत असल्याचेही त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. काही ठिकाणी बाहेरच्या राज्यांतून मुली आणून विवाहाच्या नावाखाली फसवणूक होत असल्याच्या घटनाही समोर येत असल्याचे त्यांनी सांगितले. याच बरोबर ग्रामीण भागातील ऊसतोड महिला कामगारांची कठीण परिस्थितीही आमदार धस यांनी मांडली. अपुऱ्या आरोग्य सुविधा, कमी हिमोग्लोबिन, प्रचंड शारीरिक श्रम आणि गर्भारपणातही काम करण्याची वेळ येत असल्याची वस्तुस्थिती त्यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिली. महिला कामगारांसाठी आरोग्य तपासणी, सॅनिटरी नॅपकिनची उपलब्धता, वैद्यकीय सुविधा आणि सुरक्षित कामाच्या परिस्थितीबाबत ठोस धोरण आखण्याची मागणी त्यांनी केली. समाजात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करायची असेल, तर मुलींचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता आणि संपत्तीतील हक्क याबाबत ठोस पावले उचलली पाहिजेत, असे मतही त्यांनी व्यक्त केले. अनेक वेळा बहिणी स्वतःहून मालमत्तेतील हक्क सोडतात; मात्र महिलांना त्यांच्या हक्कांचा सन्मान मिळाला, तर कुटुंबातील अनेक सामाजिक प्रश्न आपोआप कमी होतील, असे त्यांनी नमूद केले. मुलींचे संरक्षण, त्यांचे सन्मानाने जगणे आणि ग्रामीण महिलांचे प्रश्न सोडवणे ही केवळ शासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची जबाबदारी असल्याची ठाम भूमिका आमदार धस यांनी सभागृहात मांडली.

### सावरगाव येथे नाथ संजीवन समाधी महोत्सवाचे आयोजन

# 14 ते 19 मार्चदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम; देशभरातून भाविकांची उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान, सावरगाव येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही नाथ संजीवन समाधी महोत्सव २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. १४ ते १९ मार्च २०२६ या कालावधीत विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यासाठी राज्यासह देशभरातून नाथभक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

महोत्सवाची सुरुवात १४ मार्च रोजी सकाळी ७ वाजता श्री मच्छिंद्रनाथ गडावरून निशाण पेठणकडे प्रस्थान करून होईल. १६ मार्च रोजी सकाळी ८ वाजता पैठण येथे निशाण मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर १८ मार्च रोजी सकाळी ११ वाजता श्री मच्छिंद्रनाथ गडावर कावडीचे आगमन होणार असून दुपारी १२ वाजता महाआरती संपन्न होईल.याच दिवशी दुपारी १.३० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत नाथभक्तांनी कावडीने पैठण, काशी व इतर तीर्थक्षेत्रांतून आणलेल्या पवित्र गंगाजलाने समाधीवर जलाभिषेक करण्यात येईल. तसेच सायंकाळी ४ ते पहाटे ५.३० वाजेपर्यंत समाधीस्थानी उटणे, सुगंधी मसाले व चंदन उटी लेप लावण्याचा धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहे.१९ मार्च रोजी पहाटे ५.३० वाजता




श्री मच्छिंद्रनाथ समाधीची विधिवत महापूजा होईल. त्यानंतर सकाळी ६ वाजता महाआरती होऊन भाविकांसाठी नियमित दर्शन खुले करण्यात येणार आहे.महोत्सव काळात मंदिर परिसरात स्वच्छता राखणे, प्लास्टिकचा वापर टाळणे तसेच पाण्याच्या बाटल्या किंवा कॅन मंदिरात न आणण्याचे आवाहन देवस्थान ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे. तसेच १८ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजल्यानंतर येणाऱ्या कावडधारकांचा विचार केला जाणार नाही, अशी सूचना देण्यात आली आहे.या महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ देवस्थान ट्रस्ट, सावरगाव यांच्या वतीने सर्व नाथभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी देणगी स्वरूपात मदत करण्याचेही आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

# कामाचा माणूस" पुस्तक २२ जुलै २०२६ रोजी होणार प्रकाशित

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी/विश्वदीप कांबळे :** स्वर्गीय महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री Ajit Pawar यांच्या जीवनप्रवासावर आधारित "कामाचा माणूस" हे पुस्तक २२ जुलै २०२६ रोजी प्रकाशित होणार आहे. हे पुस्तक लेखक कान्हा खानसोळे यांनी लिहिले असून अजितदादा पवार यांच्या कार्याचा, राजकीय प्रवासाचा आणि जनतेसाठी केलेल्या कामांचा सविस्तर आढावा या पुस्तकात मांडण्यात आला आहे.

अजितदादा पवार हे त्यांच्या कार्यतत्परतेमुळे आणि प्रशासनातील वेगवान निर्णयक्षमतेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात "कामाचा माणूस" म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या याच कार्यशैलीला आणि जनतेशी असलेल्या नात्याला शब्दरूप देण्याचा प्रयत्न लेखक कान्हा खानसोळे





यांनी या पुस्तकातून केला आहे.२२ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या या पुस्तक प्रकाशन सोहळ्याकडे राजकीय, सामाजिक तसेच साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवरांचे लक्ष लागले आहे. अजितदादा पवार यांच्या कार्याची आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देणारे हे पुस्तक वाचकांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# सर्व एक्सप्लोसिव्ह आणि केमिकल कंपन्यांमधील सुरक्षा उपाययोजनांची तपासणी होणार – जिल्हाधिकारी डॉ . विपीन इटनकर यांचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राकेश यादव वाडी :** आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षिततेच्या दृष्टीने जिल्ह्यातील सर्व एक्सप्लोसिव्ह आणि केमिकल कंपन्यांमधील सुरक्षा यंत्रणांची कसून तपासणी करण्यात येणार आहे. ही तपासणी केंद्र सरकारच्या डिश, पेसा पोलिस आणि महसूल विभागाच्या संयुक्त विद्यमाने पुढील एका महिन्यात करून आपत्ती व्यवस्थापन सुरक्षिततेच्या दृष्टीने कंपन्यांनी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी दिले.

१ मार्च रोजी एसबीएल एनर्जीलिमिटेड या कंपनी मध्ये स्फोट होऊन १९ व्यक्तींचा मृत्यू व २३ व्यक्ती



जखमी झाले. या अनुषंगाने २ मार्च रोजी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आढावा बैठक घेतली. जिल्ह्यातील सर्व एक्सप्लोसिव्ह आणि केमिकल कंपन्यांमध्ये आपत्ती व्यवस्थापन व सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना सर्व इंडस्ट्रीजमध्ये आहेत का, याची पुर्नतपासणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले होते. याचबरोबर कंपन्यांनी अद्ययावत आपत्कालीन आराखडा तयार करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या होत्या. त्या निर्देशाप्रमाणे जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डॉ. विपीन इटनकर नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली इंडस्ट्रीज आपत्ती व्यवस्थापन उपाययोजना संदर्भात आढावा बैठक आज घेण्यात आली.

बैठकीत एसओपी, कायद्यातील सुधारणा, नवीन नियमावली यावर चर्चा करण्यात आली. तपासणीदरम्यान कंपन्यांमध्ये आढळून येणा-या त्रुटींची पूर्तता तातडीने करण्याचे निर्देश जिल्हाधिका-यांनी यावेळी दिले.

जिल्हा पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनीही यावेळी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधला. कामगारांच्या सुरक्षेला उद्योजकांनी सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज आहे. कंपनीच्या बजेटमध्येही कामगारांच्या सुरक्षेसाठीची पुरेशी तरतूद ठेवण्याची गरज आहे. कर्मचा-यांना नियमितपणे प्रशिक्षण, आवश्यक उपकरणे याविषयीची त्यांनी माहिती दिली.यावेळी अतिरिक्त जिल्हाधिकारी प्रवीण महीरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी अंकुश गावंडे यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, पेसो आणि डिशचे प्रतिनिधी उद्योग क्षेत्रातील कंपन्यांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते. डिश आणि पेसो यांच्या वरिष्ठ अधिका-यांकडून औद्योगिक सुरक्षिततेबाबत सादरीकरण करण्यात आले.

# लाखनी तालुक्याचा अभिमान – यश रिनाईतची केंद्र शासनाच्या इन्सपायर अवार्ड साठी निवड

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी स्वप्नील काटवले/लाखनी भंडारा :** सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, सावरी/मुरमाडी येथील इयत्ता ९ वीचा विद्यार्थी यश विजय रिनाईत याची केंद्र शासनाच्या प्रतिष्ठेच्या INSPIRE Award साठी निवड झाल्याने विद्यालयासह संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

विज्ञान विषयातील नाविन्यपूर्ण कल्पना, संशोधनवृत्ती आणि प्रकल्प सादरीकरणाच्या जोरावर यशने ही उल्लेखनीय कामगिरी साध्य केली आहे. विज्ञान क्षेत्रात विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना आणि संशोधनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने दिला जाणारा हा पुरस्कार



अत्यंत मानाचा मानला जातो.

या यशाबद्दल जीवन शिक्षण संस्था, लाखनी चे सचिव धनंजय तिरपुडे यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून त्याला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या प्राचार्या स्वाती वासनिक यांनीही यशच्या मेहनतीचे व जिद्दीचे कौतुक करत हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.तसेच विद्यालयातील शिक्षक सुभाष ठाकरे, विकास काशिवार, कु. डिंपल गणविर, कु. स्मिता आगाशे, कु. प्रतिभा अगळे, कु. मनिषा सुखदेवे, कु. सुरेखा गभणे, मनोज खोब्रागडे, आशिष सिंगनजुडे, भरत राऊत, शिरीष लोगडे, एच. एच. मेमन, कु. स्वाती खोटेले, कु. साठवणे, सौ. आगाशे आदी शिक्षकांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन करून पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या.यश विजय रिनाईत यांच्या या यशामुळे सिद्धार्थ विद्यालयाच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून इतर विद्यार्थ्यांसाठीही ही प्रेरणादायी बाब ठरत आहे.

# सणसर प्राथमिक आरोग्य केंद्रात एचपीव्ही लसीकरणाचा शुभारंभ–कर्मचाऱ्यांना कडक तंबी

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, सणसर येथे सोमवार दि.9 मार्च रोजी 14 वर्षे वयोगटातील मुलींना गर्भाशयमुख कर्करोग प्रतिबंधासाठी एचपीव्ही लसीकरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सदस्या सौ माधुरी सागर भिसे व सरपंच श्री यशवंत नरुटे पाटील मा युवा उदयोजक सागर भिसे यांच्या हस्ते झाले. लसीकरणानंतर



झालेल्या बैठकीत प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर,सुपरवायझर,नर्स व कर्मचारी यांच्याकडून औषध पुरवठा,रिक्त पदे आपत्कालीन सेवा,रुग्णवाहिका व ड्रायव्हर उपलब्धता याबाबत माहिती घेण्यात आली.औषधांचा स्टॉक रजिस्टर वेळेवर अपडेट करण्याचे आदेश देण्यात आले तसेच पगार वेळेवर मिळतो का याची चौकशी करण्यात आली.

जिल्हा परिषद सदस्या सौ.माधुरी सागर भिसे यांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला की,कर्मचाऱ्यांचा कामात हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही तक्रारी आल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई होईल. नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देणे ही प्राथमिक आरोग्य केंद्राची जबाबदारी असल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. या उपक्रमास स्थानिक नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून गावात आरोग्याविषयी जागरूकता वाढली आहे. नागरिकांनी लसीकरण मोहिमेचे स्वागत करत प्रशासनाच्या या पावलाचे कौतुक केले.

# कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कारासाठी संदीप आहेर यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी/राहुल कुलकर्णी** : नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाच्या वतीने दिला जाणारा जिल्हास्तरीय "कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार" यंदा महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड येथील शिक्षक संदीप अंबादास आहेर यांना जाहीर झाला आहे.हा पुरस्कार सोहळा येत्या १५ मार्च रोजी कविवर्य कुसुमाग्रज नगरी शिरवाडे वणी येथे आयोजित करण्यात आला आहे. नेत्ररोगतज्ज्ञ पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने यांच्या हस्ते तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत



पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश सलादे, उपाध्यक्ष किरण पवार आणि सहचिटणीस सतीश सोनवणे यांनी दिली.

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकास हा पुरस्कार दिला जातो. ज्ञानदानासोबतच प्रवचन, मराठी भाषा सक्षमीकरण आणि समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण योगदान देत विविध शैक्षणिक उपक्रम राबवल्याबद्दल संदीप आहेर यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.या निवडीबद्दल महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे अध्यक्ष गुलाबराव जोंधळे, उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, कार्यकारी संचालक दीपक जोंधळे, कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रेय जोंधळे तसेच मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# बडेवाडी, मानुर ग्रुपग्रामपंचायतीने खाल्ले रस्त्यात पैसे

## रस्ता केला असे दाखवून शासन दरबारी वीस लाखाचा गंडा

**दैनिक युवक आधार**

**राम ढाकणे उरण / रायगड** : मानुर ग्रुपग्रामपंचायत ता. शिरूर कासार जिल्हा बीड चक्क शासनाची फसवणूक करून वीस लाख रुपयाचा गंडा शासनाला घातला आहे, मौजे बडेवाडी मानुर ग्रुपग्रामपंचायत अंतर्गत एक छोटेसे गाव, या गावामधील स्वामी गणेशानंद महाराज सभामंडप ते बर्डे वस्ती (१८०मिटर) लांबीचा कागदोपत्री रस्ता दाखवुन सदरचा रस्ता तयार केला असे भासवुन शासनाची दिशाभुल करुन त्या संबंधितले बिले पास करून तब्बल वीस लाख रुपये एव्हडी मोठी रक्कम घेऊन शासनाची मोठी फसवणुक केली आहे.

त्या संबंधित मानुर ग्रुपग्रामपंचायत वर फौजदारी पात्र गुन्हे दाखल करुन शासनाचा निधी परत मिळवण्या साठी शेतकरी उद्धव किसन सानप यांनी



जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे लेखी तक्रारी अर्ज केला आहे, शासनाची मोठी आर्थीक फसवणुक केल्याने संबंधीत ग्रामपंचायतीचे अधिकारी, कर्मचारी व सरपंच तसेच सदर कामाशी निगडीत पंचायत समीती - शिरुर कासार, येथील इतर अधिकारी / कर्मचारी या सर्वांनी मिळुन आपसात संगणमत करुन सदरहू ठिकाणी रस्ता केल्याचे भासवुन बोगस बिले उचलुन शासनाची मोठी फसवणुक केलेली आहे. प्रत्यक्षात मात्र सदरहू ठिकाणी तशा कोणत्याही प्रकारचा रस्ता केलेला नाही. करीता आपले स्तरावर सदर रस्त्याची प्रत्यक्षात स्थळ पाहणी करुन संबंधीत रस्त्याचे गुत्तेदार, ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी, सरपंच तसेच पंचायत समीती कार्यालय, शिरुर कासार, येथील सदर रस्त्याचे कामा संबंधीचे अधिकारी , कर्मचारी यांनी केलेल्या शासनाच्या निधीचा अपहार केल्यामुळे त्यांचे विरुध्द फौजदारीपात्र स्वरुपाचे गंभिर गुन्हे दाखल करुन त्यांनी केलेल्या अपहाराची रक्कम शासन दफ्तरी परत व्याजासह वसुल करण्याचे आदेशीत करणे अत्यंत आवश्यक व जरुरीचे आहे. तसेच सदरची कार्यवाही हि दफ्तर दिरंगाई कायद्यातील तरतुदी नुसार विहीत मुदतीत करणे क्रमप्राप्त आहे. तसेच सदर प्रकरणामध्ये आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मला अवगत करावा. अशी विनंती उध्दव किसन सानप मो. नं. ९९६०३७३२०६ व बडेवाडी मधील ग्रामस्थ यांनी तक्रारी अर्जाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे केली आहे.

**प्रतिलिपी,**

१) मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

२) मा. मुख्यकार्यकारी अधिकारी साहेब, जि. प. बीड,

३) मा. गटविकास अधिकारी साहेब, पं. स. शिरुर कासार,

यांच्याकडे देखील प्रतिलिपी पाठवल्या आहेत.

# विधानपरिषद : 'बेस्ट'च्या स्वत :च्या बसांची संख्या वाढवणार अपघातांबाबत बैठक घेण्याचा निर्णय – राज्यमंत्री माधुरी मिसाळ



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : मुंबईतील सार्वजनिक वाहतुकीचा कणा मानल्या जाणाऱ्या बृहन्मुंबई इलेक्ट्रिक सप्लाय अँड ट्रान्सपोर्ट (BEST) उपक्रमाच्या बससेवेबाबत आज महाराष्ट्र विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सविस्तर चर्चा झाली. यावेळी राज्याच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी 'बेस्ट'च्या स्वतःच्या मालकीच्या बसांची संख्या वाढवण्याच्या दृष्टीने सरकार आवश्यक उपाययोजना करत असल्याची ग्वाही दिली.

सदस्यांनी बेस्ट बसचे वाढते अपघात, चालकांचे प्रशिक्षण, समुपदेशन, वेतन तसेच कंत्राटी पद्धतीने चालवल्या जाणाऱ्या बससेवेबाबत विविध प्रश्न उपस्थित केले. त्याला उत्तर देताना मिसाळ म्हणाल्या की, सध्या 'बेस्ट'कडे स्वतःच्या मालकीच्या २४९ बस आहेत, तर २,५२८ बस भाडेतत्त्वावर चालवल्या जात आहेत. मात्र मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येचा आणि प्रवाशांच्या गरजांचा विचार करता शहराला सुमारे १० हजार बसांची आवश्यकता आहे.

यासाठी 'बेस्ट' प्रशासनाने ६,५५५ विद्युत बसांची ऑर्डर आठ कंत्राटदारांना दिली होती. मात्र विविध कारणांमुळे या बसेस अपेक्षित प्रमाणात उपलब्ध होऊ शकल्या नाहीत. २०२६ मध्ये केवळ ६८५ बसेस उपलब्ध झाल्या, अशी माहितीही त्यांनी सभागृहात दिली.

**चालकांच्या भरतीबाबत स्पष्टीकरण**

बेस्टकडून कंत्राटी तत्त्वावर चालक न घेता स्वतःचे चालक नियुक्त करावेत, अशी मागणी काही सदस्यांनी केली. त्यावर उत्तर देताना मिसाळ म्हणाल्या की, सध्या बेस्टकडे ६,६१४ स्वतःचे चालक कार्यरत आहेत. जेव्हा बस कंत्राटी तत्त्वावर घेतल्या जातात, तेव्हा संबंधित बस पुरवठादारांकडून चालकांचीही व्यवस्था केली जाते.

**अपघातांचा प्रश्न गंभीर**

बेस्ट बसमुळे होणाऱ्या अपघातांचा प्रश्न गंभीर असल्याचे सभागृहात अधोरेखित करण्यात आले. या पार्श्वभूमीवर या विषयावर सविस्तर चर्चा करण्यासाठी सभापतींच्या दालनात विशेष बैठक घेण्यात यावी आणि परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनाही त्या बैठकीला उपस्थित राहण्याचे निर्देश द्यावेत, अशी विनंती सदस्यांनी केली. सभापतींनी ही विनंती मान्य करत लवकरच बैठक आयोजित करण्यास संमती दिली.

**चालकांवर कारवाई**

दरम्यान, सरकारने दिलेल्या लेखी उत्तरात अपघातांबाबत झालेल्या कारवाईची माहितीही दिली. सन २०२२ ते २०२४ या तीन वर्षांच्या कालावधीत अपघाताच्या कारणामुळे 'बेस्ट' उपक्रम आणि भाडेतत्त्वावरील बस पुरवठा संस्थांमधील ५८ बसचालकांना बडतर्फ करण्यात आले, तर ६०३ बसचालकांना निलंबित करण्यात आले आहे.

याशिवाय इतर शिस्तभंगाच्या कारणांमुळे २०२२ ते २०२५ या कालावधीत 'बेस्ट'च्या ६३ चालकांना बडतर्फ, तर ८७६ चालकांना निलंबित करण्यात आल्याची माहितीही सरकारने सभागृहात लेखी उत्तराद्वारे दिली. बेस्ट बससेवा अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रवाशांसाठी सोयीस्कर करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करण्यात येत असल्याचेही सरकारकडून यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत अनोळखी महिलेचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी** : खांदेश्वर पोलीस ठाणे हद्दीत बेशुद्ध अवस्थेत महिला आढळली होती सदर महिला रूपाली तामणकर वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे हीस दिनांक २४/०९/२०२५ रोजी १३:१० वाजताचे दरम्यान उपचारासाठी दाखल करण्यात आले होते ती गेली सहा महिन्यापासून सदर पहिला उपचार घेत होती दिनांक २३/०२/२०२६ रोजी रात्री ०९:१५ वा. सुमारास सदर महिला मयत झाली आहे सदर महिलांच्या नातेवाईकांचा शोध सुरू असून त्यास कोणी ओळखत असल्यास शैलेश



भद्रे ९८५०६४१६२९पोलीस उपनिरीक्षक - खांदेश्वर पोलीस ठाणे, यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे

# महानगरपालिकेत 'ग्राहक संरक्षण समिती' स्थापन करण्याची मागणी

## नागरी विकास ग्राहक मंचाचे महापौरांकडे निवेदन

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे/विदर्भ संपादिका** : महानगरपालिकेच्या कामकाजात अधिक पारदर्शकता आणण्यासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेत स्वतंत्र 'ग्राहक संरक्षण समिती' स्थापन करावी, अशी मागणी नागरी विकास ग्राहक मंच यांच्याकडून करण्यात आली आहे. या संदर्भात मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी नागपूरच्या प्रथम नागरिक तथा महापौर नीता राजेंद्र ठाकरे यांची भेट घेऊन विशेष निवेदन सादर केले.



महानगरपालिकेत पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण यांसारख्या विविध विभागांसाठी स्वतंत्र समित्या कार्यरत असतात. त्याच धर्तीवर सामान्य नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण करण्यासाठी 'ग्राहक संरक्षण समिती' स्थापन करण्यात यावी, असे मंचाचे म्हणणे आहे. या समितीमुळे नागरिकांना त्यांच्या समस्या थेट मांडण्यासाठी अधिकृत व्यासपीठ उपलब्ध होईल आणि प्रशासनाकडून त्यावर त्वरित निर्णय घेणे सुलभ होईल.

या निवेदनावेळी मंचाचे महाराष्ट्र राज्य प्रांत कार्याध्यक्ष मिलिंद खेकाळे आणि नागपूर जिल्हा संघटक उत्तमजी सालवकर उपस्थित होते. त्यांनी महापौरांसोबत या विषयावर सविस्तर चर्चा केली. नागरिकांच्या हितासाठी अशी समिती अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

**समितीची रचना कशी असावी?**

मंचाच्या मते या समितीत केवळ प्रशासकीय अधिकारीच नव्हे तर लोकप्रतिनिधी आणि ग्राहक संघटनांचे प्रतिनिधी यांचाही समावेश असावा. अनुभवी ग्राहक स्वयंसेवकांना देखील समितीत स्थान दिल्यास नागरिकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे मांडल्या जाऊ शकतील आणि त्यावर योग्य तो तोडगा काढता येईल.

**प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद**

निवेदनाची दखल घेत महापौर नीता ठाकरे यांनी या मागणीवर सकारात्मक भूमिका व्यक्त केली. या प्रस्तावाचा योग्य तो विचार करून लवकरच समिती स्थापन करण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

**नागरिकांच्या हितासाठी पुढाकार**

'ग्राहक संरक्षण समिती' स्थापन झाल्यास महानगरपालिकेच्या सेवांबाबत नागरिकांच्या तक्रारी थेट समितीसमोर मांडता येतील. त्यामुळे प्रशासनाच्या कामकाजात पारदर्शकता वाढेल आणि नागरिकांच्या प्रश्नांना अधिक वेगाने न्याय मिळण्यास मदत होईल, असा विश्वास मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.यावेळी नागरी विकास ग्राहक मंचाच्या वतीने महापौरांचा सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. नागरिकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी अशा प्रकारचा पुढाकार घेतल्याबद्दल शहरातील विविध ग्राहक संघटनांनीही समाधान व्यक्त केले आहे.

# अर्थसंकल्पातून निफाडच्या रस्त्यांसाठी २५ कोटीचा निधी मंजूर – आमदार दिलीपराव बनकर

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी/विलास गायकवाड** : राज्याच्या सन २०२६-२०२७ च्या अर्थसंकल्पात निफाड मतदार संघातील रस्ते व पुलांच्या कामांसाठी रक्कम रु.२५ कोटी निधी मंजूर झाल्याने निफाड मतदार संघातील नागरीकांना दळणवळणाच्या सुविधा अधिक सक्षम होणार असल्याची माहिती निफाड तालुक्याचे आमदार दिलीपराव बनकर यांनी दिली.

निफाड मतदार संघातील प्रामुख्याने १) राष्ट्रीय महामार्ग -९५३ (जऊळकेवणी) पासून चिंचखेड- आथरे वस्ती-उंबरखेड- पिंपळगांव राष्ट्रीय महामार्ग-३ ते बेहेड- नारायणटेंभी-कारसुळ- पंचकेश्वर- कुंभारी- वावी ते खडक ओझर - राज्यमार्ग - २५ ला मिळणारा रस्ता प्रजिमा १०९ कि.मी.२८/०० ते ३६/०० ची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : कुंभारी ते वावी) (रक्कम रु.१ कोटी), २) रौळस देवपुर पंचकेश्वर उगाव थेटाळे रस्ता प्रजिमा-१७३ कि.मी.३/०० ते ५/५०० रस्त्याची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : गणपती मंदिर ते पंचकेश्वर) (रक्कम रु.१ कोटी ५० लाख), ३) शिरवाडे वणी पालखेड दावचवाडी रस्ता रामा - ४१४ कि.मी.२०/५०० ते २५/१०० रस्त्याची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : शिरवाडे वणी ते पालखेड) (रक्कम रु.२ कोटी ५० लाख), ४) राष्ट्रीय महामार्ग



पासून गोरठाण वावी रानवड ब्राम्हणगाव वनसगाव थेटाळे कोतमगाव ते तालुका हद्द रस्ता प्रजिमा-१७४ कि.मी.०/०० ते ५/०० ची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : शिरवाडे वणी ते वावी) (रक्कम रु.३ कोटी ५० लाख), ५) ओझर सुकेणे पिंपळस कोठुरे रस्ता प्रजिमा -६७ कि.मी.१७/५०० ते २२/३०० ची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : कोठुरे ते निफाड) (रक्कम रु.३ कोटी), ६) निफाड काथरगाव कुरुडगाव कोठुरे रस्ता प्रजिमा – १५५ कि.मी.०/०० ते ४/६०० ची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : जळगाव फाटा ते काथरगाव) (रक्कम रु.२ कोटी ५० लाख), ७) ओझर सायखेडा हिवरगाव रस्ता रामा क्र.३५ कि.मी.०/०० ते ५/०० मध्ये रस्त्याची मजबुतीकरणासह सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : ओझर ते खेरवाडी) (रक्कम रु.३ कोटी २० लाख), ८) मोहाडी हद्द ते साकोरे कोकणगाव शिरसगाव वडाळी पिंप्री कोठुरे रस्ता प्रजिमा -४७ कि.मी.१०३/५०० मध्ये लहान पुलाचे बांधकाम करणे व कि.मी.१०१/५०० ते १०५/०० मध्ये रस्त्याची मजबुतीकरणासह सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : शिरसगाव ते वडाळी नजिक) (रक्कम रु.३ कोटी), ९) जऊळके वणी उंबरखेड पिंपळगाव बेहेड कारसुळ पंचकेश्वर रस्ता प्रजिमा – १०९ कि.मी.२३/०० ते २६/०० ची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : रामा २७ - दावचवाडी ते पंचकेश्वर) (रक्कम रु.२ कोटी), १०) पाचोरे वणी आहेरगाव लोणवाडी कारसुळ वडाळी कसबे सुकेणे रस्ता प्रजिमा – ६१ कि.मी.४३/०० ते ४९/०० ची सुधारणा करणे. ता.निफाड (भाग : पाचोरे वणी ते आहेरगाव) (रक्कम रु.२ कोटी ८० लाख) या १० रस्ते कामांना मंजुरी दिल्याबद्दल निफाड तालुक्याचे आमदार दिलीपराव बनकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले तसेच अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगनराव भूजबळ यांचे निफाड तालुक्यांच्या वतीने जाहीर आभार मानले.

# महाराष्ट्र युवा सेवा संघाच्या वतीने शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज)** : पश्चिम पारसीवाडी येथे युवा प्रतिष्ठान संचालित महाराष्ट्र युवा सेवा संघाच्या वतीने भव्य शिवजयंती उत्सव सोहळा दि. ६ ते ८ मार्च या कालावधीत साजरा करण्यात आला होता.यावर्षी मंडळाचे १८ वे वर्ष होते.या कार्यक्रमा निमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांची भव्य मिरवणुक काढण्यात आली होती.या मिरवणुकीत महिला व पुरुष पारंपरिक वेषभूषेत सहभागी झाले होते. लेझीम या महाराष्ट्राच्या



सांस्कृतिक आणि ग्रामीण कला प्रकाराने मिरवणुकीत रंगत आणली. तसेच महिलांसाठी मंगळागौर,हळदी कुंकू,लकी ड्रॉ कुपन,लहान मुलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विविध कौशल्य प्रदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी विभागीय महिला,नागरिक व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.रविवार दि. ८ रोजी सका.१० वा.रक्तदान शिबिर व सायं.८ वा.हभप कृष्णा महाराज जाधव (मुद्रांक जिल्हाधिकारी,मुंबई शहर )यांचे शिव किर्तन आयोजित करण्यात आले होते.या शिव कीर्तन व रक्तदान शिबिराला विभागीय नागरिक,शिवभक्त व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# खिडकीत कॉपी आढळली सीसीटीव्ही फुटेज मागविले

## कॉप्यांचा सुळसुळाट : मालेगाव तालुक्यात कॉपीमुक्त परीक्षेचा फज्जा .!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील** : दहावीच्या परीक्षेत दरम्यान तालुक्यातील मुंगळा येथील मोरेश्वर विद्यालयाच्या परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांच्या बैठकी जवळील खिडकीत कॉपी आढळून आल्याचा प्रकार सहा मार्च उघडकीस आला. शिक्षणाधिकारी संजय ससाने यांच्या भेटीदरम्यान हा प्रकार निदर्शनास येता संबंधित कक्षातील सीसीटीव्ही फुटेज शिक्षण विभागाकडे सादर करण्याचे निर्देश दिले.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आलेल्या भरारी पथकांनी 6 मार्च रोजी तालुक्यातील विविध परीक्षा केंद्रांची तपासणी केली. यावेळी शिक्षणाधिकारी ससाने यांनी मुंगळा येथील मोरेश्वर विद्यालयाच्या परीक्षा केंद्राला भेट दिली असता एका विद्यार्थ्यांच्या बैठकी जवळील खिडकीत कॉपी आढळून आली. याप्रकरणी संबंधित कक्षातील सीसीटीव्ही फुटेज शिक्षण विभागाकडे सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत . त्यामुळे या प्रकरणात पुढे कोणती कारवाई होते, याकडे शिक्षण क्षेत्रासह तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, तालुक्यात 20 फेब्रुवारीपासून दहावीच्या परीक्षेला सुरुवात झाली असून मालेगाव तालुक्यातील 14 परीक्षा केंद्रातील तीन हजाराहून अधिक विद्यार्थी परीक्षा देत आहेत. यामध्ये रिसोड तालुक्यातील श्री शिवाजी हायस्कूल या एका केंद्राचे नियंत्रणही मालेगाव कार्यालयाकडे सोपविण्यात आले आहे. बैठे व भरारी पथकामार्फत कॉपीमुक्त अभियानाची अंमलबजावणी अपेक्षित असली तरी ग्रामीण भागातील काही परीक्षा केंद्रावर कॉप्यांचा सुळसुळाट सुरू असल्याची चर्चा आहे.

**बैठ्या पथकांच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह**

**प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांच्या पथकाने तालुक्यातील परीक्षा केंद्रावर केवळ एक दिवस दिलेल्या भेटीदरम्यान कॉफीचा गैरप्रकार आढळून आला. मात्र स्थानिक पथकांना एकाही केंद्रांवर गैरप्रकार आढळून येत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. परीक्षा केंद्रातील गैरप्रकार उपन्यासाठी प्रत्येक केंद्रात बैठ्या पथकांची नियुक्ती करण्यात आली; मात्र आतापर्यंत या पथकाने किती गैरप्रकार उघडकीस आणून कारवाई केली, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहे.६ मार्च रोजी शिक्षणाधिकाऱ्यांच्या भेटीदरम्यान एका विद्यार्थ्यांच्या बैठकी जवळील खिडकीत कॉपी आढळून आली होती. शिक्षणाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार संबंधित कक्षातील सीसीटीव्ही फुटेज शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आले आहे.**

**एस. एन.खडसे केंद्रप्रमुख,**
**मोरेश्वर विद्यालय, मुंगळा.**

# फ्लाईंग बर्डस् नॅशनल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी /भीमराव गावडे:** विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्यातील सुप्त प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित करण्यात आलेले 'फ्लाईंग बर्डस् नॅशनल इंग्लिश स्कूल'चे भव्य 'वार्षिक स्नेहसंमेलन २०२५-२६' रविवारी (दि. १ मार्च) मोठ्या उत्साहात आणि दिमाखदार सोहळ्यात पार पडले. या सांस्कृतिक महोत्सवात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली.

या शानदार कार्यक्रमाचे उद्घाटन बीड जिल्ह्याच्या माध्यमिक शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी मा. श्री. नानाभाऊ हजारे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले. तसेच या प्रसंगी विशेष उपस्थिती म्हणून माध्यमिक शिक्षण विभागाचे सहाय्यक शिक्षण उपनिरीक्षक मा. श्री. कांतीकुमार देवकते साहेब लाभले होते. बीड कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. सभापती श्री अरुण नाना डाके यांच्यासह अन्य मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला. त्यात युवा व्याख्याते



श्री परमेश्वर बनकर, काठोडा गावचे मा. सरपंच बालासाहेब डाके, श्री अनिल धनुरे, पिंपळगाव मोची येथील ग्रा. पं. सदस्य श्री गोरख आबा आखाडे, बळी तात्या आखाडे, श्रीराम मंडप सर्व्हिसचे श्री दत्ता ढवळे, घोडका राजुरीचे मनोज आबा घोडके, पालक प्रतिनिधी म्हणून श्री उमेश देवकते, श्री किशोर डावकर, श्री ज्ञानेश्वर डावकर, श्री बाळासाहेब शिंदे इत्यादी मान्यवरांनी आपली हजेरी लावली. यांच्यासह फिनिक्स क्लासेसचे श्री अजय घोडके सर व श्री नारायण कोठूळे सर, ज्ञानपुष्पा गुरुकुलचे श्री अनिल भोसले सर, सरस्वती अकॅडेमीचे श्री गोरक्ष हुरकुडे सर आदी मान्यवरांच्यासह शाळेतील सर्व पालकवृंद, महिला पालक, पंचक्रोशीतील सर्व तरुण, प्रौढ, वृद्ध या सांस्कृतिक सोहळयास उपस्थित होते. शाळेतील बालकलाकारांनी आपल्या नृत्यातून, गायनातून आणि विविध मनोरंजनात्मक कार्यक्रमांतून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. छोट्या विद्यार्थ्यांनी दाखवलेली आपली नाजूक आणि लाडली कला दाखवली तर मोठ्या विद्यार्थ्यांनी नाटक, नृत्य आणि विविध कला करत विविध सांस्कृतिक दर्शन घडविले.

आपल्या उद्घाटनीय मनोगतात मा . श्री. नानाभाऊ हजारे साहेब यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे भरभरून कौतुक केले आणि आजच्या काळात अभ्यासाबरोबरच अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे जीवनातील महत्त्व विषद केले. इंग्रजी ही जागतिक भाषा असून जगाचे दार उघडणारी भाषा आहे आणि तीच बाब उराशी घेऊन ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या लेकरांसाठी झटणारे या शाळेचे संचालक श्री आर एन आखाडे यांनी ही शाळा उभा केली असे नमूद करत मा. साहेबांनी शाळेचे संचालक व मुख्याध्यापक यांची प्रशंसा केली. सोबतच दर्जेदार शिक्षण देण्याचे आश्वासन घेतले.तसेच मा. श्री. कांतीकुमार देवकते साहेब यांनीदेखील विद्यार्थ्यांना आणि शाळेला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या आनंदोत्सवात पंचक्रोशीतील आणखी इतर देखील मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवण्यासाठी पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री शाम सर, सर्व शिक्षक वृंद त्यात श्री डी एस सर, श्री वाटुरे सर, सौ. गोरे मॅडम, सौ. निर्मला शिंदे, सौ. रंजना हुरकुडे, कु. जया येवले, सौ. जयश्री काकडे, सौ. पूनम शिंदे, सौ. आकांक्षा शिंदे, यांसह व्यवस्थापन समिती आणि विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले. या भव्य दिव्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. यादव मॅडम यांनी केले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने करण्यात आली.

# जिद्दीने गाठले 'आयपीएस'चे शिखर!

## सिल्लोडमध्ये भिकन रोजेकर यांचा आमदार सत्तार यांच्या हस्ते गौरव

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** : कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर भारतीय पोलीस सेवेत (IPS) यश संपादन करणाऱ्या जळगाव सपकाळ (ता. भोकरदन) येथील सुपुत्र भिकन जगन रोजेकर यांचा सिल्लोड येथे विशेष सत्कार करण्यात आला. आमदार अब्दुल सत्तार यांनी भिकन रोजेकर यांच्यासह त्यांच्या आई-वडिलांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शहरातील 'शिवसेना भवन' येथे हा सोहळा उत्साहात संपन्न झाला.




तालुका शिवसेना, चर्मकार समाज बांधव व कृष्णा लहाने मित्र मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार सत्तार म्हणाले की, "ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली पाहिजे. भिकन रोजेकर यांचे यश तरुणांसाठी प्रेरणादायी असून, त्यांनी परिसराचे नाव उज्ज्वल केले आहे."सत्काराला उत्तर देताना भिकन रोजेकर यांनी आपल्या संघर्षाची माहिती देत, अभ्यासातील सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर हे यश कसे मिळवले, याचे मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी आमदार सत्तार व आयोजकांचे आभार मानले.

याप्रसंगी जगन रोजेकर, बेबाबाई रोजेकर, जिल्हा बँक चेअरमन अर्जुन पा. गाढे, केशवराव पा. तायडे, विठ्ठल सपकाळ, नंदकिशोर सहारे, सतीश ताठे, कृष्णा लहाने, सुधाकर गायकवाड, अजितशेठ बागवान, किशोर अग्रवाल, सुदर्शन अग्रवाल, प्रा. शिवाजी वाठोरे, जगदीश बेदवे, सुभाष लोखंडे, रवी गायकवाड, राजू रोजेकर, सोनवणे सर, दीपक नेटके, डॉ. दीपक बिरारे, ईश्वर गायकवाड आदींसह पदाधिकारी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरमाडी/सावरी येथे १५ मार्चला भव्य मोफत कॅन्सर निदान शिबिर

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे/लाखनी तालुका प्रतिनिधी** : बारस्कर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल आणि डायलिसिस सेंटर , नागपूर यांच्या वतीने आयुषमान भारत प्रधान मंत्री जन आरोग्य योजना तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत भव्य निःशुल्क कॅन्सर रोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि.१५ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत मुरमाडी/सावरी येथील साई मंदिर देवस्थान, मुरमाडी / सावरी येथे होणार आहे.

या शिबिरात कॅन्सर आजाराचे प्राथमिक निदान, तपासणी व मार्गदर्शन करण्यात येणार असून नागरिकांना तज्ञ डॉक्टरांकडून मोफत सल्ला मिळणार आहे. कॅन्सर हा गंभीर आजार असला तरी प्राथमिक अवस्थेत निदान झाल्यास उपचाराने तो पूर्णपणे बरा होऊ शकतो, त्यामुळे नागरिकांनी वेळेत तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

शिबिरात कॅन्सर तज्ञ डॉ. जयप्रकाश बारसकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. निमा असोसिएशन भंडारा यांच्या सहकार्याने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. कॅन्सरची लक्षणे, प्रतिबंधक उपाययोजना व आवश्यक उपचार याबाबत सविस्तर मार्गदर्शनही करण्यात येणार आहे.या शिबिरासाठी डॉ. चंद्रकांत निंबार्ते (माजी अध्यक्ष, निमा भंडारा), डॉ. राजेश चंदवानी (अध्यक्ष, निमा भंडारा), डॉ. मनीषा निंबार्ते (सदस्य, जि.प. भंडारा – मुरमाडी/सावरी) व डॉ. रुपेश दुरुगकर (सचिव, निमा भंडारा) व समस्त सदस्य, निमा भंडारा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.कॅन्सरच्या वाढत्या प्रमाणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी या मोफत निदान शिबिराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पत्रकार संजीवन मित्रा तुला निळा सलाम

६ मार्च २०२६,तिथीनुसार शिवजयंती,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिवसैनिक दरवर्षी शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरी करतात. विक्रोळी कन्नमवार नगरातील प्रभात मित्र मंडळात ८ मार्च जागतिक महिला दिनाचे आयोजन माझ्याकडे असल्यामुळे मी नियोजनात व्यस्त होतो.सकाळी छत्रपती संभाजी महाराज मैदानात मॉर्निंग वॉकला गेलो.मंडळाचे सल्लागार ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर यांनी विभागातील महिलांचा सत्कार शाल न देता छोटेसे सन्मानचिन्ह

द्या असे सुचविले.विभागातील महिलांना आमंत्रण व्हॉट्सअप वर दिले होते.पण मला ते पटत नव्हते.म्हणून त्यांच्या घरी व कार्यालयात प्रत्यक्ष नेऊन दिले.त्यामुळेच माझ्या फोन वरील चार्जिंग संपले होते.घरी आल्यावर फोन बॅटरी बंद करून चार्जिंगला लावला.त्या दिवशी विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असल्यामुळे व राज्याचा अर्थसंकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दुपारी २ वाजता मांडणार होते.स्नान केले.आणि फोन चार्जिंगवरुन उघडला.तर माझा मित्र व सहकारी ज्येष्ठ पत्रकार समाजभूषण राजू झनके याचा मेसेज पाहिला.ज्येष्ठ पत्रकार संजीवन ढेरे याचे साकीनाका येथे राहत्या घरी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले आहे.हा मेसेज पाहून मी अवाक झालो.आणि मी ओक्साबोक्सी रडू लागलो.माझी पत्नी मला म्हणाली, लहान मुलासारखे काय रडता.रडू नका.मी संजीवन ढेरेचा मुलगा प्रितेश ढेरेला फोन केला.तो म्हणाला,काका पप्पा आत्ताच गेले.तुम्ही घरी या.मला महिला दिनाच्या ट्रॉफीज बनवायच्या होत्या.मी टागोरनगरला गेलो आणि त्या बनवायची ऑडर दिली. मला त्याचे आर्टवर्क व महिलांची नावे संध्याकाळी सात पर्यंत द्यावयाची होती. मग मी साकीनाका येथे संजीवनच्या घरी गेलो.त्याचा देह चटईवर शांत झोपलेला दिसला.वाटलं तो उठून माझ्याशी संवाद साधेल.गेली ५ ते ६ वर्ष कधी मणकाच्या आजाराने व अर्धांगवायूच्या झटक्याने तो आजारी होता.त्याच्या मुलाने व वहिनीने मला पाहताच हंबरठा फोडला.यापुढे तुम्ही आमच्या घरी येणार नाही असे ते रडत म्हणत होते.सायंकाळी सात वाजता अंत्ययात्रा न्यायाचे ठरले.माझ्या फोनची बॅटरी पून्हा लो झाली.मग एका खोलीत संजीवनी देह तर त्याच्या बेडरुम मध्ये फोन चार्जिंगला लावून मी महिला दिनाच्या कार्यक्रमाची आखणी करत होतो.हे करता करता रात्रीचे नऊ वाजले.आणि संजीवनची अंत्ययात्रा एका मोक्ष रथातून निघाली. त्याचा देह निळ्या कपड्याने गुंडाळलेला होता.स्मशानभूमी यायला अर्धा तास बाकी होता.रथ हळूहळू चालत होता.रस्त्याच्या दूर्तफा शिवजयंती असल्यामुळे भगवे वातावरण होते.भगव्या गुलालात शिवजयंती असल्यामुळे मिरवणुकी चालत होत्या. तर संजीवनचा देह निळ्या कपड्यात होता.रथ जसाजसा पुढे जात होता.त्यावेळी हजारो शिवसैनिकांनी थांबून संजीवनच्या देहाला नमस्कार केला.एवढा माझा मित्र मोठा होता.हे भाग्य कमी लोकांना मिळते.मोक्ष रथात संजीवनला पाहून व स्मशानभूमीत पोहोचायला अर्धा तास जावयास शिल्लक असल्यामुळे त्याच्या आठवणी माझ्या डोळ्यासमोरून तरळून गेल्या.संजीवन व




मी एका प्यालातील मित्र.ज्यावेळी संजीवन ढेरे याचे नाव मंत्रालयात घेतले जावयाचे तेव्हा माझे नाव घेतले जायचे.तो माझा जिवश्च कंटश्य मित्र होता.तो नेहमी मला म्हणायचा आपली रे ची जोडी आहे.कारण तुझ्या पानसरे आडनावात रे आहे.आणि माझ्या ढेरे आडनावात रे आहे. ज्यांच्या आडनावात रे ते क्रांती करतात.आपल्याला पत्रकार क्षेत्रात क्रांती करायची आहे. तो नेहमीच म्हणायचा मिलिट्रीत दोन रेजिमेंट लढाऊ आहेत.एक मराठा व दुसरी महार. तु मराठा व मी जयभीम ( महार ) अशी आपली जोडी आहे.आपण लढाऊ आहोत. माझ्या व त्याच्या पत्रकारतीची सुरुवात एकाच वेळी झाली.तो श्री या साप्ताहीकात कामगार सदर लिहीत असे.असे एका कामगार नेत्याची मुलाखत घेणासाठी तो आला होता.त्यावेळी मी देखील गेलो होतो.त्या दिवसापासून त्याची माझी घट्ट मैत्री झाली.त्यानंतर आम्ही बाबूराव काणे यांच्या लोकसंकेत वृत्तपत्रातून मी मुंबई महानगरपालिका व तो कामगार श्रेत्र अशी बातमीदारी करु लागलो.त्यानंतर काही काळ त्याची माझी भेट झाली नाही.त्यानंतर मुंबईत दैनिक मुंबई संध्या नावाचे नवीन दैनिक सुरू झाले.या दैनिकात संपादकीय पानावर मुंबई महानगरपालिकेतून माझा लेख व शेजारच्या पानावर कामगार क्षेत्र हा त्याचा लेख प्रसिद्ध झाला.यामुळे आम्ही पून्हा एकत्र आलो.ते शेवटपर्यंत.मग त्याला मंत्रालय बीट व मला कोकण सकाळ मधून मंत्रालय बीट मिळाली.दैनिक मुबई संध्या बंद पडला.त्याची नोकरी गेली.काही काळ तो बेकार होता.दै.सामानातून पत्रकार विद्याधर चिंदरकर याचा मला फोन आला. ढेरेला दै.सामानात पाठव.मग तो दैनिक सामानात रुजू झाला.हे उपकार तो कधीही विसरला नाही.सामनात त्याला मंत्रालयाची जवाबदारी देण्यात आली.दै.सामनात त्यांनी दिलेल्या बातम्या चांगल्याच गाजल्या. मला आठवतय त्याची मी पाहिलेला गांधी ही बातमी चांगलीच गाजली.पण त्यानी दै.सामानात राजीनामा का दिला हे मला शेवटपर्यंत समजले नाही.दै.पुण्यनगरीत तो रमला नाही.तेथे मतभेद झाल्यानंतर त्यांनी दै. पुण्यनगरीत राजीनामा न देता तो शेवटपर्यंत गेला नाही.

संजीवन मंत्रालयातील बहुजन पत्रकारांचे नेतृत्व करीत असे.त्यानी मला जिवाची मुंबई दाखविली.मुंबईचे एकही डान्स बार आम्ही सोडले नाही की तेथे आम्ही गेलो नाही.रात्री घरी जायला उशीर होत असे.मग तो आम्हाला टॅक्सी व रिक्षाचे पैसे आमच्या खिशात कोंबायचा.मंत्रालयात असताना संध्याकाळचे रंगीत सरबतचे कार्यक्रम नेहमी तो ठरवायचा.म्हणायचा लवकर बातम्या द्या.मग आम्हाला रात्री जेवूनच पाठवायचा.तो दिलदार होता.मला भूक लागायची तेव्हा मंत्रालयाच्या उपहार गृहात घेऊन जायचा व मला सेपरेट मनसोक्त नाष्टा द्यायचा.रंगीत कार्यक्रम करीत असताना मला जास्त खायला लागायचे म्हणून तो इतरांना सोडून मला सेपरेट डीश द्यायचा.एकदा त्याला मंत्रालयात एका कामाचे पैसे मिळाले.तेव्हा खुशीने तो मला म्हणाला,तुला घरी काय वस्तू पाहिजे.मी म्हणाले,दे फ्लोडींग पलंग.मला वाटल तो टिंगल करतोय.एक दिवस सकाळी मला त्याचा फोन आला.उल्हासनगरला जायचे. काम आहे.आम्ही तिघे तो,पत्रकार संतोष गवळी व मी उल्हासनगरला गेलो तर त्याने मला फर्निचर दुकानात नेले.आणि माझ्या आवडीचा पलंग दिला.शब्दाला पक्का होता.माझ्या आजारात तो एकटाच मला जे. जे. रुग्णालयात भेटायला आला होता. माझा त्याचा एकदाच गैरसमज झाला होता. मला २०११ साली महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार मिळाला. तेव्हा मी त्याला सांगितले नव्हते. त्यावेळी तो प्रचंड चिडला होता.१५ दिवस बोलला नाही.राग निवळल्यावर शेवटी माझ्याकडून त्याने जंगी मेजवानी घेतली होती.

यामध्ये माझे मंत्रालयातील मित्र प्रमोद डोईफोडे,राजू झनके,जासंग बोपेगावकर,परेश समजितस्कर,संतोष गवळी यांचा समावेश होता.आजारी पडल्यानंतर त्याने मंत्रालयात येणे सोडले. माझी एकुलती एक मुलगी धरती मला सोडून गेली.तेव्हा पत्रकार राजन पारकर यानी घरी येऊन सांगितले की तिचे कार्य झाल्यानंतर तो दररोज मंत्रालयात जायचे.मी संजीवनला फोन केला. धरती गेली.मी एक मुलगी दत्तक घेतो.तेव्हा तो प्रचंड चिडला. म्हणाला तिचे तू सगळे केले आहे.आणि तू काय वांझोटा आहेस का ? या दोघांनी मला जे सल्ले दिले त्याचे मी आजपर्यंत तंतोतंत पालन करीत आहे.करोना काळात तो माझ्याशी तासनतास बोलायचा. पण आजारी पडल्यावर त्याची वाणी बंद झाली.मी भेटावयास गेल्यावर तो प्रथम ओळखायचा नाही.मग ओळखल्यावर तो रडत बसायचा.म्हणून मी त्याच्या घरी जाणे टाळत असे.त्याचा मुलगा प्रितेशच्या लग्नात मी सपत्नीक गेलो होतो.मला पाहिल्यावर त्याचे डोळे पाणावले.पण गेल्या पाच वर्षात पंधरा दिवसातून एकदा तो स्वप्नात यायचा. पण स्वप्नात त्याची भूमिका माझ्याविषयी विरोधी असायची.मी घाबरून उठत असे.आता वाटत मी त्याला नेहमी घरी भेटावयास जायला पाहिजे होते.अश्या कितीतरी आठवणी माझ्या डोळ्यासमोरून गेल्या.पांढरी सफारी घातलेली त्याला आवडत असे.त्याचे विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे,अशोक चव्हाण,रामदास आठवले,चंद्रकांत हंडोरे,नवाब मलिक,संजय राऊत,अरुण गवळी आदिंशी निकटचे संबंध होते.तर कामगार पूढारांचे त्याचे वैयक्तिक संबंध होते.त्याचा त्यांच्यावर धाक होता.टेलिफोन,हिंदुस्थान लिव्हर मध्ये त्यानी काही काळ नोकरी केली.पण पत्रकार क्षेत्र त्यानी व्यवसायासाठी निवडले. तो स्वाभिमानी होता.पण त्याने जिवनात कसलीही तडजोड केली नाही.संजीवन तुझ्या जाण्याने आपली मैत्री तुटली आहे. तुला मी कधीच विसरणार नाही.संजीवन मित्रा तुला माझा निळा सलाम

**नासिकेत पानसरे**
**ज्येष्ठ पत्रकार**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर**
**समाजभूषण पुरस्कार महाराष्ट्र शासन**
**सन्मानित**
**९९३०९९८९७८**

# कृषी विज्ञान केंद्र येथे महिलांच्या आरोग्य, पोषण व आत्मविकासावर भर देत जागतिक महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजीत ठाकूर :** भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र व पिरॅमिड स्पिरिच्युल सोसायटीज मुव्हमेंट, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन दि. ८ मार्च २०२६ रोजी कृषी विज्ञान केंद्र करडा प्रक्षेत्रावर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महिलांचे सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक सशक्तीकरण, पोषण सुरक्षा आणि मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या विश्वस्त सौ. जयश्रीताई अनंतरावजी देशमुख या होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून पिरॅमिड स्पिरिच्युल सोसायटीज मुव्हमेंट, महाराष्ट्रच्या प्रमुख देवयानी नवगजे, करडा गावच्या सरपंच गंगाताई देशमुख, संस्थेच्या विश्वस्त शिलाताई उकळकर, कीटकशास्त्रज्ञ आर. एस. डवरे, पशुविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ मयूर देशमुख, गृहविज्ञान शाखेच्या प्रमुख शुभांगी वाटाणे तसेच लेखापाल आर. व्ही. कोठाळे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविकात गृहविज्ञान शाखेच्या प्रमुख शुभांगी वाटाणे यांनी जागतिक महिला दिन साजरा करण्यामागील




उद्देश स्पष्ट करताना महिलांचे समाज व कुटुंब व्यवस्थेमधील योगदान, त्यांचे हक्क, लैंगिक समानता आणि सर्वांगीण सशक्तीकरण या बाबींविषयी जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात सौ. जयश्रीताई अनंतरावजी देशमुख यांनी महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिलांनी स्वतःचे व कुटुंबाचे आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी पोषण परसबाग (Nutrition Garden) उभारण्यावर भर द्यावा, तसेच संतुलित व पोषक आहाराचा अवलंब करावा असे आवाहन केले. याशिवाय मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ध्यान व योगसाधनेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी महिलांचे सशक्तीकरण हे समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूलभूत आधार असल्याचे सांगितले. महिलांना समान संधी, सन्मान आणि अधिकार मिळाल्यास समाज अधिक प्रगत आणि समृद्ध होतो, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी कीटकशास्त्रज्ञ आर. एस. डवरे यांनी शाश्वत व सुरक्षित अन्न उत्पादनासाठी सेंद्रिय शेती तसेच एकात्मिक शेती पद्धती (Integrated Farming System) यांचा अवलंब करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. विषमुक्त अन्न उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक अवलंबित्व कमी करून पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देवयानी नवगजे यांनी मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ध्यान (Meditation) या वैज्ञानिक पद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले. ध्यानामुळे मानसिक शांतता मिळते, एकाग्रता वाढते, तणाव व चिंता कमी होतात, सकारात्मक ऊर्जा निर्माण होते तसेच भावनिक संतुलन राखण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. यानंतर त्यांनी उपस्थितांना ध्यानाचे प्रात्यक्षिकही करून दाखविले. या कार्यक्रमास परिसरातील महिला, युवक-युवती तसेच विविध महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पशुविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ मयूर देशमुख यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना कदम यांनी मानले.

# कल्याणमध्ये 'वज्रेश्वरी महोत्सवा'चा दिमाखदार सोहळा; ठाणे जिल्ह्यातील महिला बचत गटांच्या उत्पादनांचे भव्य प्रदर्शन


**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी आणि त्यांच्या हाताला हक्काची बाजारपेठ मिळवून देण्यासाठी "वज्रेश्वरी महोत्सव: जिल्हास्तरीय सरस व मिनी सरस" प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामविकास व पंचायत राज विभाग आणि 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ठाणे यांच्या वतीने या भव्य महोत्सवाचे नियोजन करण्यात आले असून, यात ग्रामीण संस्कृती आणि आधुनिकतेचा सुंदर मिलाफ पाहायला मिळणार आहे. या महोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्वयंसाहाय्यता समूहातील महिलांनी स्वतः उत्पादित केलेल्या मालाचे भव्य प्रदर्शन आणि विक्री होय. यामध्ये प्रामुख्याने हाताने बनवलेल्या सुंदर हस्तकलेच्या वस्तू, आकर्षक गृहसजावटीचे साहित्य, दर्जेदार कापडी पिशव्या आणि पारंपारिक पादत्राणे यांचा समावेश आहे. खवय्यांसाठी या प्रदर्शनात अस्सल ग्रामीण चवीचे विविध खाद्यपदार्थ आणि घरगुती पद्धतीने बनवलेले मसाले उपलब्ध असणार आहेत. ग्रामीण भागातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आणि त्यांच्या परिश्रमाला योग्य व्यासपीठ मिळवून देण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.हा महोत्सव कल्याण पश्चिम येथील रामबाग परिसरातील मॅक्सी ग्राऊंड, मधुरिमा स्वीट शॉप व नूतन शाळेजवळ आयोजित करण्यात आला आहे. १० मार्च ते १४ मार्च २०२६ या कालावधीत सकाळी १०:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार असून, या प्रदर्शनासाठी प्रवेश पूर्णपणे विनामूल्य ठेवण्यात आला आहे

दर्जेदार उत्पादने, सुंदर हस्तकला आणि ग्रामीण चवीचा हा अनोखा संगम अनुभवण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवाला नक्की भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांमार्फत करण्यात आले आहे.




# मुदगल येथे पशुधनाचे लसीकरणाचे आयोजन



**दैनिक युवक आधार**


**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/तालुक्यातील मुदगल येथे दि ११ मार्च रोजी सकाळी ठीक ९ वाजता मुदगल येथील भक्त निवास समोर जनावरांच्या कवड्या जवळ लाळ खुरकूत (RMD) आदी आजारांवर प्रतिबंधात्मक लसीकरणाचे आयोजन करण्यात येणार असून सर्व पशुपालकांनी आपल्या पशु गाय म्हैस बैल.व सहा महिने पूढील वासरे व शेळ्या मेंढ्या यांना (PPR) लसीकरणाचे आयोजन करण्यात आले आहे याच बरोबर आपल्या पशुची ऑनलाईन नोंदणी साठी पशुपालकांनी आपले आधार कार्ड मोबाईल लिंक असणारे पशु पालकांनी नोंदणी करून घ्यावी असे आवाहन पशुवैद्यकीय अधिकारी वाघाळा येथील पशुवैद्यकीय अधिकारी यांनी सांगितले

# ज्ञानाच्या पंखांना स्त्री-शक्तीचे बळ : शैक्षणिक क्रांतीत महिलांचे उत्तुंग यश!"- सीमा मापारी . संचालिका स्व . माणिक पोदार स्कूल

**दैनिक युवक आधार**

**रिसोड प्रतिनिधी/रणजीत सिंह ठाकुर** : रिसोड -नारी शक्तीचा जागर: स्व. माणिक पोदार लर्न स्कूल वाढोणा येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा.आज जगभरात 'जागतिक महिला दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. स्त्रीत्वाचा सन्मान, तिची जिद्द आणि कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आज विविध क्षेत्रात कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. 'एक स्त्री शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते' या उक्तीचा प्रत्यय आजच्या आधुनिक युगात पावलोपावली येत आहे.

**कर्तृत्वाचा आलेख उंचावतोय**




आजची महिला केवळ चूल आणि मुलापुरती मर्यादित राहिलेली नाही. अंतराळातील भरारीपासून ते सीमेवरच्या रक्षणापर्यंत आणि कॉर्पोरेट जगतापासून ते शेतातील कष्टापर्यंत महिलांनी आपला ठसा उमटवला आहे. आजच्या विशेष दिनानिमित्त विविध कार्यालये, शाळा आणि संस्थांमध्ये कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करून त्यांच्या प्रवासाला दाद देण्यात आली.

आजचा दिवस म्हणजे केवळ कॅलेंडरवरील एक तारीख नाही, तर हा दिवस आहे स्त्रीच्या अस्तित्वाचा, तिच्या संघर्षाचा आणि तिने गाठलेल्या उत्तुंग शिखरांचा गौरव करण्याचा. आज आपण २१ व्या शतकात आहोत. आजची स्त्री ही केवळ 'चूल आणि मूल' इथपर्यंत मर्यादित राहिलेली नाही. आज ती आकाशात झेप घेणारी अंतराळवीर आहे, सीमेवर रक्षण करणारी जवाना आहे, शेतात राबणारी बळीराजाची साथिदार आहे आणि कॉर्पोरेट जगात नेतृत्व करणारी अधिकारीही आहे.

याच दिनाच्या औचित्याने शाळेत महिला दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्यांच्या वतीने माँ जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून हारार्पण व दिपप्रज्वलन करण्यात आहे. यावेळी शाळेतील चिमुकल्यांनी छान भाषण, नृत्य सादरीकरण करून सर्वांची मने जिंकली. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षिका व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# घाटंजी येथे 'खेळ पैठणीचा' उत्साहात ; अश्विनी उदार ठरल्या 'होम मिनिस्टर'

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी महेश पेन्दोर** : जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून घाटंजी नगरीतील एकता महिला मंडळ व यशस्विनी बहुउद्देशिय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने 'होम मिनिस्टर: खेळ पैठणीचा, सन्मान नारीशक्तीचा' हा विशेष कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या महिलांचा आणि घाटंजी नगर परिषदेत नवनियुक्त झालेल्या महिला पदाधिकाऱ्यांचा व सदस्यांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मायाताई यमसनवार होत्या, तर व्यासपीठावर यशस्विनी संस्थेच्या अध्यक्षा संगीता भुरे, सचिव साधना ठाकरे, वर्षा गुजलवार आणि नगर परिषदेच्या नवनिर्वाचित महिला सदस्य उपस्थित होत्या. यावेळी




सौ. संगीता भुरे, उपाध्यक्षा सोनल ठाकरे आणि सभापती नम्रता मेश्राम यांनी आपल्या मनोगतातून महिला शक्तीचा गौरव केला.

महिलांच्या सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी घाटंजी शहरात प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या 'खेळ पैठणीचा' या स्पर्धेत तब्बल ७० महिलांनी सहभाग घेतला होता. या अटीतटीच्या स्पर्धेत अश्विनी उदार यांनी प्रथम क्रमांक पटकावून 'होम मिनिस्टर' होण्याचा मान मिळवला. तसेच अपर्णा चल्लावार यांनी द्वितीय, रोहिणी दांडगे यांनी तृतीय, साक्षी खर्चे यांनी चतुर्थ, तर रश्मी ठाकरे यांनी पाचवा क्रमांक मिळवला. या पाचही विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले. याव्यतिरिक्त स्मिता नार्लावार, जान्हवी वर्मा, प्रतिमा ढगले, राधिका गुंडावार आणि विशाखा अंजीकर या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाचे बहारदार संचालन अश्विनी उदार यांनी केले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी माधुरी चौधरी, पूजा उत्तरवार, पुष्पा नामपेल्लीवार, अश्विनी भुरे, सीमा ठाकरे, शालिनी जुनघरे, स्मिता मानकर आणि तेजस्विनी राऊत यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी उपस्थित सर्वांचे आभार साक्षी खर्चे यांनी मानले.

# सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची ईएसआयसी रुग्णालयाला भेट



**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग :** राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज आकस्मिक सोमवारी पेठ परिसरातील ईएसआयसी रुग्णालयाला भेट देत पाहणी केली. आपल्या भेटीदरम्यान त्यांनी रुग्णांशी संवाद साधला. रुग्णालयात मिळणारे उपचार, जेवणाचा दर्जा आदी माहिती जाणून घेतली. रुग्णालय परिसराचीही त्यांनी पाहणी केली. रुग्णालयात ठेवली जाणारी स्वच्छता याचीही कर्मचाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली . यावेळी त्यांनी डॉक्टरांशीही संवाद साधला. रुग्णांना दिले जाणारे उपचार, औषधांची उपलब्धता याची माहिती जाणून घेतली.यावेळी त्यांच्यासमवेत आरोग्य उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर उपस्थित होते.

# “अल्पवयीन प्रेम आणि कायद्याचा सापळा”

अलीकडच्या काळात तरुण पिढीत प्रेमसंबंध लवकर निर्माण होण्याचे प्रमाण वाढले आहे. मोबाईल, सोशल मीडिया आणि चित्रपटांच्या प्रभावामुळे अनेक तरुण-तरुणी भावनेच्या भरात निर्णय घेताना दिसतात. त्यातून अल्पवयीन मुलगी आणि मुलगा घरातून पळून जाण्याच्या घटना दिवसेंदिवस वाढताना दिसत आहेत. या प्रकारामुळे कुटुंबांमध्ये तणाव निर्माण होतोच, पण त्याचे गंभीर कायदेशीर परिणामही दिसून येतात.

भारतामध्ये अल्पवयीन मुलांचे संरक्षण करण्यासाठी Protection of Children from Sexual Offences Act (POCSO) हा कडक कायदा लागू करण्यात आला आहे. या कायद्यानुसार १८ वर्षांखालील मुलगी किंवा मुलगा यांच्याशी संबंधित लैंगिक स्वरूपाच्या कोणत्याही कृतीला गंभीर गुन्हा मानले जाते. त्यामुळे अनेक वेळा प्रेमसंबंधातून दोघे पळून गेले तरी मुलगी अल्पवयीन असल्यास मुलावर थेट पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल होतो.

अनेक घटनांमध्ये दोघांची संमती असली तरी कायद्याच्या दृष्टीने अल्पवयीन मुलीची संमती ग्राह्य धरली जात नाही. परिणामी मुलाला अटक, पोलीस तपास, न्यायालयीन प्रक्रिया यांना सामोरे जावे लागते. याचा त्याच्या शिक्षणावर, करिअरवर आणि सामाजिक प्रतिष्ठेवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो. काही प्रकरणांमध्ये तरुणांचे संपूर्ण आयुष्यच उद्ध्वस्त होते.

या वाढत्या घटनांमागे काही प्रमुख कारणे दिसून येतात. मोबाईल आणि सोशल मीडियाचा अनियंत्रित वापर, चित्रपटांमधील प्रेमाचे अवास्तव चित्रण, पालक आणि मुलांमध्ये संवादाचा अभाव, तसेच कायद्याबद्दलची अपुरी माहिती ही त्यातील मुख्य कारणे आहेत. या पार्श्वभूमीवर समाजाने आणि कुटुंबांनी अधिक जागरूक



होण्याची गरज आहे. पालकांनी मुलांशी मैत्रीपूर्ण संवाद साधून योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती देणारे जनजागृती कार्यक्रम घेणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

तरुणांनीही प्रेमाच्या भावनेसोबत जबाबदारीची जाणीव ठेवणे गरजेचे आहे. योग्य वय, शिक्षण आणि कुटुंबाच्या संमतीने घेतलेला निर्णयच आयुष्याला स्थैर्य देऊ शकतो. भावनेच्या भरात घेतलेले पाऊल अनेकदा आयुष्यभराची अडचण निर्माण करू शकते.

आज गरज आहे ती दोष देण्याची नाही, तर जनजागृती करण्याची. कारण एका चुकीच्या निर्णयामुळे केवळ दोन व्यक्तींचे नव्हे, तर दोन कुटुंबांचे आयुष्य प्रभावित होऊ शकते. त्यामुळे तरुण पिढीने संयम, समजूतदारपणा आणि कायद्याची जाणीव ठेवूनच जीवनातील महत्त्वाचे निर्णय घ्यावेत हाच समाजाला दिलेला महत्त्वाचा संदेश आहे.

**लेखक - रोशन लाला खोब्रागडे**
**मु. लाखनी**
**मो. ९६०४८२४७६०**

# घरफोडी करणाऱ्या संघटित गुन्हेगारी टोळीवर कारवाई – BNS कलम 112 अंतर्गत कठोर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू/संपादक नागपूर विभाग** : नागपूर शहरात घरफोडी व चोरीच्या घटनांवर प्रभावी आळा घालण्यासाठी पोलीस ठाणे बेलतरोडी यांनी संघटित गुन्हेगारीविरुद्ध कठोर कारवाई करत चार आरोपींना अटक करून त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत संघटित गुन्हेगारीचे कलम लावण्यात आले आहे.

पोलीस ठाणे बेलतरोडी येथे अपराध क्र. 57/2026 कलम 331(3), 331(4), 305(अ), 3(5) भारतीय न्याय संहिता अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याची थोडक्यात हकिकत अशी की, नमूद फिर्यादी यांनी दिनांक 04/02/2026 रोजी सायं. 18.00 वा. आपल्या घराला कुलूप लावून मुलाकडे पुणे येथे गेले होते. त्यानंतर दिनांक 08/02/2026 रोजी सकाळी 10.00 वा. सुमारास फिर्यादीचे चुलत भाऊ अभिजीत प्रकाश देशपांडे हे घराजवळील झाडांना पाणी घालण्यासाठी गेले असता त्यांना फिर्यादीच्या घराचे मुख्य दार उघडे दिसले व कोंडा तुटलेला असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ फिर्यादी यांना दूरध्वनीद्वारे माहिती दिली.

त्यानुसार फिर्यादी हे पुणे येथून नागपूर येथे येऊन घराची पाहणी केली असता बेडरूममधील लोखंडी व लाकडी कपाट फोडून त्यामधून सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच इतर मौल्यवान वस्तू चोरीस गेल्याचे आढळून आले. चोरी गेलेल्या मुद्देमालामध्ये अंदाजे 20 ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिस्कीट (किंमत अंदाजे 50,000/- रुपये), 10 ग्रॅम वजनाचे सोन्याचे झुमके व वेल (किंमत अंदाजे 25,000/- रुपये), 10 ग्रॅम वजनाच्या चांदीच्या वस्तू (किंमत अंदाजे 10,000/- रुपये), पॅनासोनिक कंपनीचा साऊंड सिस्टम (किंमत अंदाजे 11,000/- रुपये) तसेच रोख रक्कम 25,000/- रुपये असा एकूण अंदाजे 1,21,000/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरीस गेल्याचे निष्पन्न झाले. यावरून अज्ञात आरोपींनी घराचे मुख्य दाराचा कोंडा तोडून घरात प्रवेश करून सदर मुद्देमाल चोरी केल्याबाबत फिर्यादी यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्ह्याचा तपास सुरू असताना तपास पथकाने तांत्रिक माहिती व गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा शोध घेतला. तपासादरम्यान आरोपींकडून मोठ्या प्रमाणावर चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी तपासली असता ते संघटित पद्धतीने घरफोडीचे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार वरिष्ठ अधिकारी यांच्या मान्यतेने दिनांक 07/03/2026 रोजी सदर गुन्ह्यात भारतीय न्याय संहिता कलम 112 (संघटित गुन्हेगारी) प्रमाणे कलम वाढ करण्यात आले.

**सदर गुन्ह्यात खालील आरोपींना अटक करण्यात आली आहे :**

मोहम्मद जाकीर मोहम्मद शहीद, वय 23 वर्ष, रा. मोठा ताजबाग, नागपूर

गोविंद काशीराम साखरे, वय 23 वर्ष, रा. प्लॉट नं. 27, स्वामी नगर, नारी रोड, नागपूर

शेख सज्जाद उर्फ साहिल शेख आबिद, वय 21 वर्ष, रा. झळगाव नगर, नागपूर

आशुतोष उर्फ नाककाट्या लकीशंकर रवारे, वय 22 वर्ष, रा. अमरनगर, पोलीस ठाणे एमआयडीसी, नागपूर

सदर आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून सोन्याचे व चांदीचे दागिने तसेच इतर मौल्यवान वस्तू असा एकूण अंदाजे 9,51,500/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपींना न्यायालयासमोर हजर करून पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांना मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर माळोकर यांनी प्रभावीपणे करून संघटित गुन्हेगारीचे स्वरूप उघडकीस आणले आहे.

ही कारवाई मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. 04 श्रीमती रश्मिता राव, सहाय्यक पोलीस आयुक्त अजनी विभाग श्री नरेंद्र हिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे बेलतरोडी श्री मुकुंद कवाडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक किशोर माळोकर, पोलीस हवालदार सुरेंद्र बोपचे, सचिन लाचारवार, सुवास शिंगणे तसेच एएसआय अनिल बाबळे यांनी केली आहे.

**नागरिकांना आवाहन**
**नागपूर शहर पोलीस नागरिकांच्या सुरक्षेसाठी सदैव कटिबद्ध असून चोरी, घरफोडी व संघटित गुन्हेगारी करणाऱ्या गुन्हेगारांविरुद्ध नवीन भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत कठोर कारवाई करण्यात येत आहे. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींना अटक करून त्यांच्यावर संघटित गुन्हेगारीचे कलम लावून कठोर शिक्षा होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.नागरिकांनी आपल्या परिसरात संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित जवळच्या पोलीस ठाण्यास किंवा Dial 112 वर संपर्क साधावा.नागपूर शहर पोलीस संघटित गुन्हेगारीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी कटिबद्ध आहेत.**
**पोलीस ठाणे बेलतरोडी**
**नागपूर शहर.**

## मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण, रेणुका मेडीकल उमरी यांच्या वतीने श्रीसाई पालखी यात्रेकरूंना औषधी किटचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**उमरी वार्ताहर /श्री क्षेत्र गोरठे (उमरी)** : ते श्रीक्षेत्र शिर्डी संतकवी दासगणू महाराज प्रतिष्ठान गोरठे (उमरी) च्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र शिर्डी येथे श्रीराम नवमी जन्मोत्सव साजरा करण्यासाठी उमरी येथून साईभक्त पायी 425 कि.मी चा पायी चालत हि पदयात्रा शिर्डी येथे श्रीराम नवमी च्या आदल्या दिवशी पोहचते या पायी यात्रेतील भाविकांसाठी मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण, रेणुका मेडीकल उमरी ,भाजपा नांदेड लोकसभा ग्रामीण तालुका समनव्यक माजी नगरसेवक गजानन श्रीरामवार , मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. रूपेशकुमार श्रीरामवार व संचालक मंडळ यांच्या वतीने श्रीसाई पालखीचे स्वागत करत यात्रे करूंना औषधी किटचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित भाजपा नांदेड लोकसभा ग्रामीण तालुका समनव्यक माजी नगरसेवक गजानन श्रीरामवार , मानोविकास सामाजिक सेवा प्रतिष्ठाण राष्ट्रीय अध्यक्ष प्रा.रूपेशकुमार श्रीरामवार, भिमआर्मी एकता मिशन नांदेड







जिल्हाध्यक्ष स्वप्नील भोसीकर, फारुख बेग, डीआरयुसीसी मेंबर पारस दर्डा, गोपाळ राठोर, रामजी बेंबरे, अशोक मामीडवार , सुभाष पेरेवार, त्र्यंबक चिटमलवार, विवेक काचावार , गणेश पगलवाड, संदीप लापसेटवार, विनोद दर्डा, आनंद गोकावार , कृष्णा देशमुख , दत्तात्रय वारेवार , राजेश मुक्कावार , साईप्रसाद करपे , सादीक शेख ,संदीप लांडगे व सर्व साई भक्त गांवकरी मंडळी या वेळी उपस्थित होते...

## सिल्लोड पंचायत समितीवर भाजपचे वर्चस्व ; अनिता बनकर सभापती, तर भगवान आहेर उपसभापती

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** सिल्लोड तालुका पंचायत समितीच्या सभापती आणि उपसभापती निवडीत भारतीय जनता पार्टीने ऐतिहासिक यश संपादन करत सत्ता काबीज केली आहे. सभापतीपदी सौ. अनिता सुरेश बनकर आणि उपसभापतीपदी भगवान आहेर यांची अधिकृत निवड जाहीर करण्यात आली. राज्याचे लक्ष लागून असलेल्या या निवडीत भाजपने एकहाती सत्ता मिळवल्याने राजकीय वर्तुळात या निकालाची मोठी चर्चा होत आहे.

**एकमताने विजयी ठराव:**

पंचायत समितीच्या सभागृहात पार पडलेल्या निवड प्रक्रियेत भाजपच्या नवनिर्वाचित उमेदवारांना सर्व सदस्यांनी एकमुखी पाठिंबा दिला. यामध्ये वृषाली मिरकर, अनुराधा गवळे, गजानन जाधव, नेहा खरात,





तेजस्विनी जगताप, नारायण खोमणे, सुमित्रा बनसोड आणि तुळसा कोठाळे या सदस्यांनी हात उंचावून भारतीय जनता पार्टीच्या बाजूने कौल दिला. या विजयामुळे भाजप कार्यकर्त्यांनी सिल्लोड येथील पक्ष कार्यालयासमोर गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला.

या विजयाबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण, मंत्री अतुलजी सावे, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे आणि जिल्हाध्यक्ष सुहासजी शिरसाट यांनी नवनिर्वाचित सभापती व उपसभापतींचे फोनवरून अभिनंदन केले व तालुक्यातील विकासकामांना गती देण्याचे आवाहन केले.

यावेळी भाजपा अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष इद्रीस मुलतानी, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर पाटील मोठे, भाजपा किसान मोर्चा सरचिटणीस मकरंद कोरडे, जिल्हा उपाध्यक्ष सुनील मिरकर, जिल्हा परिषद सदस्य सचिन वाघ, राधाकृष्ण काकडे, माजी सभापती अशोक गरुड, माजी उपसभापती अरुण काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.याप्रसंगी कैलास जंजाळ, दिलीप दाणेकर , ज्ञानेश्वर तायडे, जिल्हा सचिव कमलेश कटारिया, सुभाष मानकर, अनिल खरात, गजानन राऊत, मंडळ अध्यक्ष मनोज मोरेल्लू, एकनाथ हिवाळे, आत्माराम पाडळे, विजय वानखेडे, गणेश भूमकर, स्वप्निल शिनगारे, नारायण बडक, किशोर गवळे, रघुनाथ पांडव, योगेश खोमणे , भाऊसाहेब उबाळे, अमोल शेळके , साहेबराव बांबर्डे यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

## शासन आपल्या दारी : छत्रपती शिवाजी महाराज महाराज्याव अभियानांतर्गत समाधान शिबिरात नागरिकांच्या असंख्य समस्यांचा झाला निपटारा

**दैनिक युवक आधार**
**जाफराबाद तालुका प्रतिनिधी/ अशोक म्हस्के :** महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराज्याव अभियान" अंतर्गत माहोरा मंडळान ७ मार्च शनिवार रोजी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांच्या विविध शासकीय योजनांशी संबंधित समस्या ऐकून त्यांचे त्वरित निराकरण करण्यात आले तसेच अनेक योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांना प्रत्यक्ष देण्यात आला.

यावेळी उपविभागीय अधिकारी बी. सर्वनन तहसीलदार मंगेश साबळे, जिल्हा परिषद सदस्य संतोष लोखंडे, ताकृअ अमोल शिंदे, मंडळाधिकारी लहाने सरपंच गजानन लहाने, दगडूबा गोरे, चौरमोल भाऊसाहेब जाधव, कृष्णा फुलमाळी, भिमराज ब्राम्हणे, जी डब्लु भालके, अमोल मुरकुटे, दळवी, सागर शेळके, एळवते,तसेच परिसरातील सरपंच मंडळी ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, कृषी विभागाचे कर्मचारी, पोलीस पाटील, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर, शेतकरी व विविध योजनांचे लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या समाधान शिबिरात शासनाच्या विविध योजनांचा लाभ नागरिकांना थेट देण्यात आला. त्यामध्ये सातबारा उताऱ्यांचे वाटप, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण, मोफत ५ ब्रास रेतीच्या पासचे वाटप, एमआरएस विभागामार्फत जॉब कार्ड वाटप, तसेच उत्पन्न, जात, रहिवासी व ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

याशिवाय बँकांच्या माध्यमातून बचत गटांना कर्ज वाटप, ट्रॅक्टर मळणी यंत्राचे वितरण, घरकुल योजनेतील लाभार्थ्यांना




धनादेश (चेक) वाटप, बालकांसाठी बेबी किट वितरण तसेच कामगार विभागामार्फत विविध प्रकारच्या किटचे वाटप करण्यात आले.या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देण्यात आली तसेच त्यांच्या तक्रारी व अडचणी ऐकून त्यांचे निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांनी मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे नागरिकांना शासनाच्या योजना एकाच ठिकाणी उपलब्ध होऊन मोठा दिलासा मिळाला.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी महसूल विभाग, ग्रामपंचायत व संबंधित सर्व विभागांनी समन्वयाने काम केले. कार्यक्रमास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा त्यांच्या गावातच, सुलभ व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी महसूल विभागामार्फत जाफराबाद तालुक्यात 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियान' (टप्पा–१) ७ मार्च व १४ मार्च, १० एप्रिल व १७ एप्रिल, १ मे व १५ मे असे एकूण सहा दिवस आयोजित करण्यात आले असल्याची माहिती तहसीलदार मंगेश साबळे यांनी दिली.

या विशेष शिबिराच्या माध्यमातून एकाच ठिकाणी १५ पेक्षा अधिक महसुली सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, प्रलंबित अर्ज व प्रकरणांचा तात्काळ निपटारा करण्यावर प्रशासनाचा भर राहणार आहे. विविध प्रमाणपत्रे, फेरफार, अकृषिक परवानग्या आदी कामांसाठी नागरिकांना वारंवार तहसील कार्यालयात जावे लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर हे अभियान महत्त्वाचे ठरत आहे. 'शासन आपल्या दारी' ही संकल्पना प्रभावीपणे राबवून नागरिकांचा वेळ, खर्च व गैरसोय कमी करण्यासाठी हे शिबीर उपयुक्त ठरणार आहे. शिबिरास्थळी तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित राहून अर्ज स्वीकृती, कागदपत्रांची तपासणी व तत्काळ कार्यवाही करण्यात येत आहे . आवश्यक कागदपत्रे पूर्ण असल्यास अनेक सेवा त्याच दिवशी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या उपक्रमामुळे विशेषतः शेतकरी, विद्यार्थी, सर्वसामान्य नागरिक व महिलांना मोठा दिलासा मिळत असून महसूल विभागाच्या विविध सेवांबाबत मार्गदर्शनही शिबिरात दिले जात आहे त्यामुळे पुढील शिबिरांमध्ये तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून या विशेष शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन साबळे यांनी केले.

## कृषी विज्ञान केंद्र येथे महिलांच्या आरोग्य, पोषण व आत्मविकासावर भर देत जागतिक महिला दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी/ रणजीत ठाकूर** : भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र व पिरॅमिड स्पिरिच्युल सोसायटीज मुव्हमेंट, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिन दि. ८ मार्च २०२६ रोजी कृषी विज्ञान केंद्र करडा प्रक्षेत्रावर कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश महिलांचे सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक सशक्तीकरण, पोषण सुरक्षा आणि मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करणे हा होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या विश्वस्त सौ. जयश्रीताई अनंतरावजी देशमुख या होत्या. प्रमुख उपस्थिती म्हणून पिरॅमिड स्पिरिच्युल सोसायटीज मुव्हमेंट, महाराष्ट्रच्या प्रमुख देवयानी नवगजे, करडा गावच्या सरपंच गंगाताई देशमुख, संस्थेच्या विश्वस्त शिलाताई उकळकर, कीटकशास्त्रज्ञ आर. एस. डवरे, पशुविज्ञान विभागाचे शास्त्रज्ञ मयूर देशमुख, गृहविज्ञान शाखेच्या प्रमुख शुभांगी वाटाणे तसेच लेखापाल आर. व्ही. कोठाळे मंचावर उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. प्रास्ताविकात गृहविज्ञान शाखेच्या प्रमुख शुभांगी वाटाणे यांनी जागतिक महिला दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना महिलांचे समाज व कुटुंब व्यवस्थेमधील योगदान, त्यांचे हक्क, लैंगिक समानता आणि सर्वांगीण सशक्तीकरण या बाबींविषयी जागरूकता निर्माण करणे अत्यंत आवश्यक असल्याचे सांगितले.अध्यक्षीय भाषणात सौ. जयश्रीताई अनंतरावजी देशमुख यांनी महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देत महिलांनी स्वतःचे व कुटुंबाचे




आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी पोषण परसबाग (Nutrition Garden) उभारण्यावर भर द्यावा, तसेच संतुलित व पोषक आहाराचा अवलंब करावा असे आवाहन केले. याशिवाय मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ध्यान व योगसाधनेचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी महिलांचे सशक्तीकरण हे समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीचे मूलभूत आधार असल्याचे सांगितले. महिलांना समान संधी, सन्मान आणि अधिकार मिळाल्यास समाज अधिक प्रगत आणि समृद्ध होतो, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी कीटकशास्त्रज्ञ आर. एस. डवरे यांनी शाश्वत व सुरक्षित अन्न उत्पादनासाठी सेंद्रिय शेती तसेच एकात्मिक शेती पद्धती (Integrated Farming System) यांचा अवलंब करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. विषमुक्त अन्न उत्पादनासाठी शेतकऱ्यांनी रासायनिक अवलंबित्व कमी करून पर्यावरणपूरक शेती तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देवयानी नवगजे यांनी मानसिक व शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी ध्यान (Meditation) या वैज्ञानिक पद्धतीचे महत्त्व स्पष्ट केले. ध्यानामुळे मानसिक शांतता मिळते, एकाग्रता वाढते, तणाव व चिंता कमी होतात, सकारात्मक ऊर्जा निर्माण होते तसेच भावनिक संतुलन राखण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. यानंतर त्यांनी उपस्थितांना ध्यानाचे प्रात्यक्षिकही करून दाखविले. या कार्यक्रमास परिसरातील महिला, युवक-युवती तसेच विविध महिला बचत गटांच्या सदस्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषी विज्ञान केंद्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून विशेष परिश्रम घेतले.

# रस्त्याच्या कडेला असलेल्या वाळलेल्या गवताने अचानक घेतला पेट



**दैनिक युवक आधार**

**परतूर-जालना(अशोक ठोके) :** शहरातील मेनरोडवर रस्त्याच्या कडेला असलेल्या वाळलेल्या गवताने अचानक पेट घेतल्याने जवळच असलेल्या लाकडी साहित्याच्या दुकानासमोर ठेवलेल्या लाकडी दरवाजाने पेट घेतला,याचवेळी दुकानाला आग लागून संपूर्ण दुकान आगीच्या भक्ष्यस्थानी पडण्याची शक्यता होती,मात्र नागरिकांनी सतर्कता व वेळीच केलेल्या मदतीमुळे सदरील आग आटोक्यात आली आणि संपूर्ण दुकान आगीच्या नुकसानीपासून थोडक्यात वाचली. ही घटना सोमवारी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास घडली. शहरातील मुख्य रस्त्यावर विठ्ठल मंदिराजवळ गणेश गायकवाड यांचे लाकडापासून दरवाजे, खिडक्या तयार करण्याचे दुकान आहे. आज सोमवारी दुपारी तीन वाजता गायकवाड हे दुकान बंद करून जेवण करण्यासाठी घरी गेले होते. त्याच सुमारास सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार हे मोंढा भागातून गाव भागात असलेल्या त्यांच्या घरी दुचाकीवरून जात होते. याच वेळी पाडेवार यांना दुकानाच्या शेजारी असलेल्या गवताने पेट घेतल्याचे व धूर निघत असल्याचे लक्षात आले. भडकलेल्या आगीने क्षणार्धात संपूर्ण दुकान कवेत घेतले असते मात्र पाडेवार यांनी प्रसंगावधान राखत आजूबाजूच्या नागरिकांना याबाबत कल्पना दिली. नागरिकांनी घरातून पाणी आणत आग विझविण्याचा प्रयत्न केला. समोर असलेल्या अशोक उबाळे यांच्या दुकानाचे बांधकाम सुरु आहे. त्या ठिकाणाहून त्यांनी पाण्याचा पाईप आणून आग विझवली. माजी नगरसेवक गणेश पवार, ज्ञानेश्वर मोरे, अण्णासाहेब खंडागळे, परमेश्वर खाटीकमारे, बाबा उबाळे, गणेश गायकवाड, नितीन उबाळे यांच्यासह बांधकाम मजूर यांनीही आग विझविण्यास मदत केली. पाडेवार यांच्या सतर्कने आगीची मोठी दुर्घटना टळली आहे.

# पोलीस शिपाई भरतीमध्ये चार तरुणांकडून उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन जप्त

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** नवी मुंबईतील पोलीस भरती प्रक्रियेदरम्यान चार उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन जप्त करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी चारही उमेदवारांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून कळंबोली पोलीस ठाण्यात त्यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना कळंबोली येथील पोलीस मुख्यालयात उघडकीस आली.

पोलीस बनण्याचे स्वप्न घेऊन भरती प्रक्रियेत सहभागी झालेल्या उमेदवारांनीच कायद्याचा भंग केल्याने अखेर त्यांनाच पोलीस ठाण्याच्या कारवाईला सामोरे जावे लागले.मुंबईसह राज्यभरात पोलीस शिपाई आणि चालक पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू आहे. उमेदवारांना उन्हाळ्याचा त्रास होऊ नये यासाठी नवी मुंबई पोलिसांनी पहाटेपासूनच भरती प्रक्रियेची सुरुवात करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे उमेदवारांना उन्हाच्या झळा कमी सहन कराव्या लागल्या. तसेच नवी मुंबई पोलिसांनी केलेल्या उत्तम नियोजनामुळे उमेदवारांना शारीरिक चाचणीदरम्यान चांगले मैदान आणि इतर आवश्यक सुविधा कळंबोली (रोडपाली) येथील पोलीस मुख्यालयात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.2024-2025 या वर्षासाठी पोलीस शिपाई, चालक पोलीस शिपाई आणि बँड्समन अशा एकूण 527 विविध पदांचा समावेश या भरती प्रक्रियेत आहे. या भरतीसाठी सुमारे 54 हजार उमेदवारांनी अर्ज नोंदवले आहेत.

दररोज सुमारे दीड ते दोन हजार उमेदवार शारीरिक चाचणी देणार असल्याचे नियोजन नवी मुंबई पोलिसांनी केले आहे. 17 मार्चपर्यंत शारीरिक चाचणी पूर्ण करण्याची आखणी पोलिसांकडून करण्यात आली आहे. दरम्यान, पोलीस शिपायांच्या सतर्कतेमुळे चार संशयित उमेदवारांकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. विशेष म्हणजे भरती प्रक्रियेदरम्यान अशा प्रकारची घटना प्रथमच उघडकीस आली आहे. या घटनेनंतर इतर उमेदवारांचीही तपासणी अधिक काटेकोरपणे करण्यात आली.

इंजेक्शन जप्त केलेल्या उमेदवारांचे वय अनुक्रमे 21, 26, 29 आणि 30 वर्षे असे आहे. त्यापैकी तीन उमेदवार आहिल्यानगर जिल्ह्यातील तर एक उमेदवार पुणे जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर आली आहे. या उमेदवारांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन आणि इंजेक्शन देण्यासाठी वापरली जाणारी सुई आढळून आली. पोलीस मुख्यालयातच त्यांना रंगेहाथ पकडण्यात आल्याने त्यांना तात्काळ कळंबोली पोलीस ठाण्यात नेण्यात आले.

कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी या चारही उमेदवारांवर बीएनएस 2023 चे कलम 223, 62 तसेच औषधीद्रव्य व सौंदर्यप्रसाधन अधिनियम 1940 चे कलम 18 (क)(फ) अन्वये गुन्हा नोंदविण्याच्या सूचना दिल्या.

**शॉर्टकटचा मोह टाळा**

**शारीरिक चाचणीदरम्यान शरीरावर परिणाम करणारे उत्तेजक द्रव्याचे इंजेक्शन उमेदवारांनी घेऊ नये. कारण अशा इंजेक्शनचा दूरगामी परिणाम संबंधित उमेदवाराच्या मनावर आणि शरीरावर होऊ शकतो. जे उमेदवार करिअरच्या सुरुवातीलाच शॉर्टकट वापरण्याचा प्रयत्न करतील, ते पोलीस खात्यात दाखल झाले तरी टिकणार नाहीत. उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी असे शॉर्टकट कोणीही वापरू नयेत. असे यश कायम टिकत नाही**

**संजय ऐनपुरे, पोलीस सहआयुक्त, नवी मुंबई**

# चूल–मूल याच्या पलीकडे धुतुम ग्रामपंचायतीचा महिलांना उद्योगाचा हात !; महिला दिनी18 बचत गटांना नवी उभारी



**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** महिला सक्षमीकरणाचा गजर फक्त भाषणात नाही, तर प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देत धुतुम ग्रामपंचायतीने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत गावातील महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी व्यवसाय उपयोगी साहित्याचे मोफत वाटप केले. या उपक्रमामुळे गावातील महिलांना स्वतःचा उद्योग उभारण्यासाठी मोठी चालना मिळाली आहे.

धुतुम ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात18 महिला बचत गटांना रोजगार उभारण्यासाठी विविध यंत्रसामग्रीचे वाटप करण्यात आले. यामध्ये खोबरे वाटण्याची मशीन, कापूर मशीन, पापड व भाकरी प्रेस मशीन, सेमी पत्रावळी मशीन, कुरडई-चकली मशीन, अगरबत्ती मशीन तसेच चटई तयार करण्याचे साहित्य अशा एकूण सुमारे 20 लाख रुपयांच्या व्यवसाय साहित्याचे वितरण करण्यात आले. विशेष म्हणजे, धुतुमच्या सरपंच सौ. सुचिता प्रेमनाथ ठाकूर यांच्या आग्रहास्त या साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी गावात विविध क्षेत्रांत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 5 महिलांचा विशेष सन्मान करून त्यांच्या जिद्द आणि कर्तृत्वाला सलाम करण्यात आला. यावेळी कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या उरण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ.भावना घाणेकर म्हणाल्या महिलांनी केवळ “चूल आणि मूल” या चौकटीत न अडकता स्वतःच्या पायावर उभे राहून उद्योजक बनावे, हा या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला सौ. सुचिता प्रेमनाथ ठाकूर (सरपंच), सौ. स्मिता नंदकुमार ठाकूर (उपसरपंच), रविनाथ बाळाराम ठाकूर, प्रकाश काशिनाथ ठाकूर, प्रेमनाथ अनंत , चंद्रकांत कमळाकर ठाकूर, सौ. कविता कुंदन पाटील, सौ. सुचिता राजन कडू, सौ. अनिता सुजित ठाकूर, सौ. करिष्मा रुपेश ठाकूर तसेच ग्रामपंचायत अधिकारी नागनाथ अरुण घाडगे आणि ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारीयांनी परिश्रम या सर्वांचे वर्गाचे गावकऱ्यांनी विशेष आभार मानले.

# सभागृहाचा अवमान प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार सूर्यकांत मोरे यांना 30 दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिफारस

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे /विदर्भ संपादिका :** विधानपरिषदेत सभागृहाचा अवमान केल्याच्या प्रकरणात अहिल्यानगर जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)चे आमदार सूर्यकांत मोरे यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्या जाहीर वक्तव्यामुळे विधानपरिषद आणि सभागृहाच्या अधिकाराचा अवमान झाल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना 30 दिवसांच्या दिवाणी कारावासाची शिफारस करण्यात आली आहे.

विधानपरिषदेत यासंदर्भात झालेल्या चर्चेनंतर सभागृहाने हा निर्णय घेतला. सभागृहाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल असे वक्तव्य मोरे यांनी सार्वजनिकरित्या केल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. याप्रकरणी सभागृहाच्या विशेषाधिकार समितीने अहवाल सादर केल्यानंतर कारवाईचा निर्णय घेण्यात आला.

निर्णयानुसार, सूर्यकांत मोरे यांना अधिवेशन काळात 30 दिवसांचा दिवाणी कारावास भोगावा लागणार आहे. सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या कालावधीत त्यांना कारावासात राहावे लागेल. अधिवेशन संपल्यानंतर त्यांची तात्पुरती सुटका करण्यात येईल.

मात्र, 30 दिवसांचा पूर्ण कालावधी पूर्ण न झाल्यास पुढील अधिवेशनाच्या काळात उर्वरित दिवसांचा कारावास भोगण्यासाठी त्यांना पुन्हा तुरुंगात जावे लागणार आहे, अशीही तरतूद करण्यात आली आहे.या निर्णयामुळे विधानपरिषदेत मोठी खळबळ उडाली असून राजकीय वर्तुळात यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

सभागृहाचा अवमान प्रकरणात इतकी कठोर कारवाई करण्यात येणे ही दुर्मिळ बाब मानली जात असून याकडे राजकीय निरीक्षकांचे लक्ष लागले आहे.

# वर्षपूर्ती होऊनही महसूल प्रशासनास पांदन रस्त्याचा मुहूर्त मिळेना



**दैनिक युवक आधार**

**प्रदिप रघुत प्रतिनिधी/ नांदगाव खंडेश्वर, अमरावती :** अमरावती जिल्ह्यातील तहसिल नांदगाव खंडेश्वर ते चादुर रेल्वे अंतर्गत शेतकऱ्यांना शेती वहीत करण्यास सुलभ व्हावे याकरिता शासनाने गावागावात पांदन रस्ते पक्क्या रस्त्यात रूपांतरित करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला मात्र प्रशासनाचा प्रत्येक निर्णयाला मूर्त रूप देण्याचे कार्य प्रशासनाला करायचे असते पण बहुतेक शासन योजनेत निर्णयाला फाटा देण्याचे काम करून प्रशासन खलनायकाची भूमिका घेताना दिसत आहे मिळालेल्या माहितीनुसार येणस येतील शेतकरी विनोद देशमुख यांनी तब्बल एक वर्षापूर्वी 9 जानेवारीला जिल्हाधिकारी अमरावती यांचे कडे लेखी अर्ज देऊन नांदगाव खंडेश्वर चांदुर रेल्वे सीमेवरील वजरादेवी कानस पांदन रस्ता तयार करण्याची मागणी केली तसेच वेळोवेळी पाठपुरावा सुद्धा केला मात्र तलाठी मंडळ अधिकारी यांनी प्रत्यक्ष पाहणी करूनही विनाकारण रस्त्याच्या कामात अडथळा आणणाऱ्यांना पाठबळ देण्याचे काम केल्याचे दुर्दैवी चित्र निर्माण झाले आहे रस्त्याला विरोध अवास्तव व अवाजवी केलेल्या मागण्यावर तहसील व भूमी अभिलेख प्रशासन अद्यापही संभ्रमावस्येत देत आहे त्यामुळे शासनाच्या तातडीने pandhan रस्ते निर्माण करण्याच्या योजनेला प्रशासन सुरूंग लावीत असल्याचे विरोधाभासी चित्र निर्माण झाले आहे या प्रकरणी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दखल देण्याची मागणी होत आहे रस्ता विरोधकांच्या अवाजवी मागण्या अन हतबल प्रशासन पांदण रस्ता निर्मितीची मागणी व माहिती अधिकार या कायदेशीर बाबीचा वापर केल्यावर तलाठी व मंडळ अधिकारी रस्ता पाहणी करता आले असता काही शेतकऱ्यांनी अवास्तव व हास्यास्पद केलेल्या मागण्यांचा तलाठी व मंडळ अधिकारी निपटरा करू न शकल्याने सदर कामाचा खोळंबा झाला

# महिलांच्या लिखाणात वास्तव आयुष्याचे दर्शन- कवी अरुण म्हात्रे

## कोमसाप रायगडचा स्त्री सन्मान पुरस्कार सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महिलांचे लेखन सत्याच्या जवळ जाणारे असून नव्या बदललेल्या वातावरणात महिलांचे लेखन आयुष्याची खरी बाजू दाखवते असे उद्गार कवी अरुण म्हात्रे यांनी पनवेल येथे काढले.जागतिक महिला दिनानिमित्ताने कोकण मराठी साहित्य परिषद रायगडच्यावतीने सन्मान कर्तृत्वाचा अंतर्गत स्त्री सन्मान सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते,यामध्ये कोकण मराठी साहित्य परिषदेच्या रायगड जिल्ह्यातील साहित्यिक महिलांना पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.




पनवेलच्या श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ,सभागृह (मार्केटयार्ड) येथे झालेल्या समारंभास पनवेल महानगरपालिकेच्या उपमहापौर प्रमिला पाटील,चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना कोठारी, महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे,नगरसेविका दर्शना भोईर,कोमसापाचे रायगडचे अध्यक्ष संजय गुंजाळ,जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी,महिला प्रमुख संध्या दिवकर,युवाशक्ती प्रमुख सिद्धेश लखमदे उपस्थित होते.

चित्रपट नाट्य निर्मात्या कल्पना विलास कोठारी यांनी,आजच्या या युगामध्ये स्त्रिया अनेक क्षेत्रात स्वतःचं कर्तृत्व दाखवत आहेत.स्त्रियांनी आपल्या आयुष्यामध्ये स्वतःच्या आनंदासाठी नेहमी जागृत रहावे,असा त्यांनी संदेश देऊन साहित्यातील क्षेत्रातील महिलांचा सन्मान करण्याचा जो उत्सव स्त्री सन्मान पुरस्काराच्या निमित्ताने आज साजरा करत आहात ते कौतुकास्पद आहे असे त्यांनी सांगितले.कोकण मराठी साहित्य परिषद रायगड जिल्ह्याने सामाजिक बांधिलकी जपत,पनवेल तालुक्यातील कर्नाळा किल्ल्याच्या पायथ्याशी वसलेली कोरलवाडीतील सर्व आदिवासी महिलांनी आपल्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा खाली ठेवला होता आणि समाजातील इतर नागरिकांप्रमाणे आम्हालाही शुद्ध पाणी मिळावे या मागणीसाठी रायगड जिल्हा परिषदेच्या कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले आणि त्यांच्या या लढायला यश मिळाले त्याबद्दल जय भवानी महिला बचत गटाच्या सुवर्णा गुरुदास वाघे आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रायगड महिला प्रमुख संध्या दिवकर यांनी केले तर आभार योगिनी वैदू यांनी मानले.

# लोकनेते बाळासाहेब देसाई यांना ११६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन

**मुंबई :** लोकनेते दिवंगत बाळासाहेब देसाई यांच्या ११६ व्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम मुंबई येथील मंत्री शंभूराज देसाई यांच्या मेघदूत निवासस्थानी पार पडला. या कार्यक्रमात दिवंगत बाळासाहेब यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आदी विविध मान्यवरांनी अभिवादन केले. उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या गत आठवणींना उजाळा दिला.

या कार्यक्रमास मंत्री छगन भुजबळ, मंत्री नरहरी झिरवाळ, मंत्री गिरीश महाजन, मंत्री अतुल सावे, मंत्री दादा भुसे, मंत्री प्रताप सरनाईक, राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. यावेळी



मेघदूत येथे लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले. बाळासाहेबांच्या सामाजिक, राजकीय आणि लोकाभिमुख कार्याचा गौरव उपस्थित मान्यवरांनी केला.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, आमदार डॉ. अतुलबाबा सुरेश भोसले, आमदार बाबुराव कोळीकर, आमदार धनंजय गाडगीळ, आमदार मुरजी पटेल, आमदार मनीषा कायंदे, आमदार किरण सरनाईक, आमदार नारायण कुचे, आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार सुहास बाबर, आमदार प्रा. चंद्रकांत सोनावणे, आमदार अर्जुन खोतकर, आमदार अशोकराव माने, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार जयंत पाटील, आमदार शशिकांत शिंदे, आमदार संजय बनसोडे, आमदार तुकाराम काते, आमदार अनंत तिडके, आमदार शरद सोनवणे, आमदार मनोज घोरपडे, आमदार भीमराव तापकीर, आमदार किशोर पाटील यांच्यासह पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे आदी उपस्थित होते.

कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, पर्यटन विभागाचे संचालक डॉ. बी. एन पाटील पर्यटन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, मराठा मोर्चा मुंबई समन्वयक विरेंद्र पवार यांचीही उपस्थिती होती. यावेळी सांगितिक आदरांजली देखील वाहण्यात आली.